दक्षिणाप्राइज कमिटीनें पसंत करून दोनशें रुपये बक्षीस दिलेलें

# अकबर-काव्य.

हा ग्रंथ

## सदाशिव प्रभाकर ताटके

ह्यांनीं केला.

परिवर्तिनि संसारे मृतः कोवा न जायते
सजातो येनजातेन याति वंशः समुन्नतिम् ।

ह्या ग्रंथाची मालकी सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदिली आहे.

पुणें येथें
इंदिरा छापखान्यांत छापिला.

सन १९०१ इसवी.

किंमत ८ आणे.

# प्रस्तावना.

काांहीं वर्षांपूर्वीं दक्षिणाप्राइज कमिटीनें अकबर बादशाहावर उत्तम काव्य करणारास बक्षीस देण्याविषयीं जाहिरात दिल्यावरून हें काव्य मीं तयार केलें, व कमिटीनें त्याजबद्दल मला २०० रुपयांचें बक्षीस दिलें. हें काव्य यापूर्वींच प्रसिद्ध व्हावयाचें, परंतु कांहीं अपरिहार्य कारणांमुळें आजपर्यंत तें तसेंच राहिलें. मध्यंतरीं हें काव्य रा० सा० शंकर मोरो रानडे बी. ए. ह्यांस मीं दाखविलें. त्यांनीं तें वाचून कांहीं सूचना केल्या, तदनुरूप कोठें कोठें फेरबदल मीं आनंदानें केला आहे. रा० सा० रानडे यांनीं कृपा करून मजकरितां वाचनाचे व सूचना करण्याचे श्रम घेतले याजबद्दल मी त्यांचे फार आभार मानितों.

प्रस्तुत ग्रंथातील नायक जगद्विख्यात अकबर बादशाहा आहे, त्याचा इतिहास सामान्यतः वाचकांस ठाऊक असतोच. ह्याकरितां त्याच्या संबंधानें कथाभाग संगतवार कळण्यासारख्या मजकुराचा उपक्षेप येथें करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. काव्यदृष्टीनें हा ग्रंथ भाषापद्धतींत व रसांत कितपत उरला आहे हें पाहण्याचें काम ग्रंथकर्त्याचें नव्हे, तर सहृदय वाचकांचें आहे. तें त्यांजकडून होण्याची उत्कट इच्छा माझ्या अंतःकरणांत उद्भवली आहे, व ती स्वाभाविकच आहे.

शेवटीं माझ्या ह्या अल्प कृतीपासून महाराष्ट्र भाषाभिज्ञ जनांस संतोष झाल्यास मी आपल्या श्रमांचें सार्थक्य झालें असें मानीन.

पुणें,
ता. १५।१।१९०१.

सदाशिव प्रभाकर ताटके.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ट. |
|---|---|
| मंगलाचरण. ... ... ... ... ... | १ |
| उपोद्घात. ... ... ... ... ... | २ |
| पूर्वजांची हकीकत.... ... ... ... ... | २ |
| अकबराचें जन्म. ... ... ... ... ... | ४ |
| हुमायुनास पुन्हा राज्य-प्राप्ति. ... ... ... ... | ७ |
| अकबरास राज्य-प्राप्ति. ... ... ... ... | १० |
| अकबराचें स्वरूप व स्वभावादि गुण. ... ... ... | १३ |
| बेरामखान. ... ... ... ... ... | १८ |
| अकबराची स्वतंत्र राजसत्ता.... ... ... ... | २४ |
| सरदारांस बोध. ... ... ... ... ... | २९ |
| चितोडावर स्वारी. ... ... ... ... ... | ३२ |
| राज्य-वृद्धि. ... .. ... ... ... | ४३ |
| मृगया. ... ... ... ... ... | ४५ |
| वनवर्णन. ... ... ... ... ... | ४८ |
| राज्यव्यवस्था. ... ... ... ... ... | ५४ |
| फत्तेपुरशिक्री. ... ... ... ... ... | ७२ |
| अबुल्फाजलाचा वध. ... ... ... ... | ७४ |
| समारंभाची स्वारी. ... ... ... ... | ७८ |
| सेलिमास राज्याचें अर्पण. ... ... ... ... | ८२ |
| उपसंहार. ... ... ... ... ... | ८३ |

# अकबर-काव्य.

## मंगलाचरण

शार्दूलविक्रीडित.

विश्व स्थावर-जंगमात्मक असे यच्छक्तिचें द्योतक[1] ।
शिल्पी अद्भुत सर्व शिल्पें[2] दिसतें ज्याचें मनोवेधक[3] ॥
जों जों वैभव[4] बुद्धिचें खरचुनी पाहे तयातें नर ।
आश्चर्यांबुधि[5]-मग्न-मीन असतो तद्वंदनीं सादर[6] ॥ १

वाग्देवी[7] तवपाद-पंकज[8] मनीं ध्यातों तुझा दास मी ।
माते हस्त तुझा शिरीं जरि असे मातें न कांहीं कमी ॥
ग्रंथाब्धीस[9] तरेन दिव्य करुणा-नौका तुझी लाधतां ।
व्हाया पंडित तुष्ट येइल मला वागर्थ[10] ही साधतां ॥ २

उपजाति.

काव्याख्य[11]-सिंधूंतिल कर्णधार[12] । नमूनि वाल्मीकि सहस्रवार ॥
त्यातें तरायाप्रति सिद्ध झालों । गळ्यांत कां सिद्धि न माळ घालो ३

---

१ प्रकाशक. २ कलाकौशल्य. ३ मनोरम. ४ ऐश्वर्य; सामर्थ्य. ५ कौतुकाच्या समुद्रांत बुडलेला मासाच जसा कांहीं. ६ तत्पर. ७ वाणी हीच देवी, सरस्वती. ८ चरण-कमल. ९ ( ग्रंथ + अब्धि ) ग्रंथरूप समुद्राला. १० वाणी आणि अर्थ. ११ कविता नांवाच्या समुद्रांतील. १२ नाव चालविणारा नावाडी-सुकाण्या + स्थिर चररूप.

## उपोद्घात.

### शार्दूलविक्रीडित.

कोणी ह्या जगती[1]-तलीं काधिं कधीं सद्भक्तसे जन्मती ।
कोणी लोक-विलक्षणत्व[2] धरिती विद्यार्जनें सन्मती ॥
कोणी देव-कृपा-सारत्[3]पातितुनो भूपाल-चूडा[4]-मणी ।
होऊनी उपलब्ध[5] पुण्य-कृतिनें लोकांस देती धणी[6] ॥ ४

### उपजाति.

वाटे मना आक्बर भूप गावा । यथार्थ त्याचा महिमा वदावा ॥
जडांध[7] मी पावुनि दिव्ययष्टि । पूर्वेतिहास[8]ज्ञ-कृती न कष्टी ५

### पूर्वजांची हकीकत.

पराक्रमी तैमुरलंग वीर । होता बळें वैरि-तृणा समीरें[9] ॥
वाटे स्वभावें सकळां सदर्प । मनुष्य देहें, जणु काल-सर्प ॥ ६
जेंगीजखानालय तें अजोळ । ज्याचें असा तार्तर तो विशाळ ॥
जिंकूनि ये देश अनेक वेगें । दिल्लीवरी हें इतिहास सांगे ॥ ७
त्याच्या कुळीं बाबर-नामधारी । जन्मास सावा[10] नर ये उभारी ॥
कीर्ति-ध्वजा[11] तोहि अ-सीम[12] शूर । अन्वर्थ[13]-नामा नरे[14]-सिंह धीर ८

---

१ भूमंडळावर. २ सामान्य लोकांहून सद्गुणांत अधिकपणा. ३ देवाच्या कृपारूप समुद्रापासून. ४ राज-रत्नें, श्रेष्ठ राजे. ५ मिळालेले, प्राप्त. ६ तृप्ति. ७ जड ( अज्ञान ), ह्मणूनच अंध. ८ पूर्वीच्या इतिहास जाणणारांचे ग्रंथ हीच उत्तम काठी. ९ वारा. १० सहावा. ११ कीर्तिरूप निशाणास. १२ निःसीम. १३ बाबर ह्मणजे सिंव्ह ह्या शब्दाच्या अर्थास अनुलक्षून आहे कृति ज्याची असा. १४ नरश्रेष्ट.

उत्साह-संपन्न अदीर्घसूत्र[1] । शेखोमराचा[2] सुत पुष्ट-गात्र ॥
अ-मित्र निर्दाळुनि राज्य पावे । तो आशिआ-मध्य-गत स्वभावें[3] ९

शार्दूलविक्रीडित.

कंदाहार[4] करून चिंतिति मुनी ज्यातें तयाच्या कृपे ।
कंदाहार[5] पराक्रमें करूनि घे शत्रू तया भी[6] लपे ॥
झाला तो नरवीर[7] बाबर जय-श्रीचा[8] पती संगरीं[9] ।
ती तेजस्वि-जनाप्रती क्रम असा[10] कीं आवडीनें वरी ॥ १०

द्रुतविलंबित.

समरकंद[11] हि घे नृप-सत्तम । अमर-नायक[12]-तुल्य-पराक्रम ॥
पुढति पाणिपतीं करि संगर । यशवरी बरवें धृति-सागर ॥ ११
चतुर राज्य करी नर[13]-केसरी । जन यदीय[14] करूं न शके सरी ॥
लवकरी तलवार-बहादर । परि मरे विधिनें निज बाबर १२

शिखरिणी.

धनानें धान्यानें युत भरत[15]-भूमी मिरवते ।
जिच्या मोठे मोठे नग[16] विलसती उंच वरते ॥
तितें घेऊं येति बहुजन असे दूरदुरचे ।
महत्वाकांक्षीते स्थल[17] कितिक होते सुमतिचें[17] ॥ १३

---

१ चेंगट नव्हे असा. २ (शेख + उमर) शेखउमर ह्याचा. ३ सहज. ४ (कंद + आहार)-कंदमुळें खाऊन. ५ या नांवाचें शहर. ६ भ्याला. ७ पराक्रमी पुरुष. ८ जय लक्ष्मीचा. ९ युद्धांत. १० क्रम असा (आहे) ह्याचा अध्याहार. ११ एका शहराचें नांव. १२ इंद्राशीं सदृश आहे पराक्रम ज्याचा. १३ नरश्रेष्ठ. १४ ज्याची. १५ हिंदुस्थान. १६ पर्वत. १७ सद्बुद्धीचें ठिकाण असे.

शार्दूलविक्रीडित.

आकाशांतुनि आमिषास[1] बघतां रोंखून येतो जसा ।
आशेनें झड घालण्या तदुपरी वेगें ससाणा तसा ॥
आला बाबर लालसा[2] धरुनि तो पोटामधें शंभर ।
दिल्ली-वल्लभ व्हावयास पुरवी त्या सर्व विश्वंभर ॥ १४

दिंडी.

भाग्यशाली सत्यैक-निष्ठ शूर । मनें प्रेमळ, संशया वसे दूर ॥
स-दय पोटीं तैसाचि हर्ष-सिंधु । महात्म्यांना तो गमे आत्म-बंधु १५
स्थापि राज्याला एथ मोगलांचे । कीर्ति ज्याची वर्णितां नये वाचे ॥
धन्य ह्मणती लोकांत असे राजे । सद्गुणांची यन्मती खाण साजे १६
पुत्र त्याचा प्रख्यात हुमायून । पित्याहुनि जो भासला किंचिदून[3] ॥
जीवमात्रां गुणभाग[4] ईश देतो । विषम बुद्धीतें परी वागवीतो १७

## अकबराचें जन्म.

गीति.

तो राज्य करित असतां केलें त्या शत्रुनें पराभूत ।
मग पारसीक-देशाधिपतिकडे जाय तो अनाहूत ॥ १८
मार्गीं जातां त्याची प्रिया हमीदा सती उमरकोटीं ।
प्रसवे एक सुतातें लाजवितो जो गुणीं अमरकोटी[5] ॥ १९

---

१ मांसास. २ इच्छा. ३ (किंचित् + ऊन) थोडा कमी. ४ गुणांचा वाटा. ५ देवे जातीस.

बहु सुखवि हुमायूना विपन्निमग्ना तया सुवार्तातें।
विपिनांत गजेंद्रातें ग्रीष्मीं सरिता जशी दवार्तातें[१] ॥ २०
अ-तुल निजें लावण्यें आधीं जी राजयासि आवडली।
अमृत-लताशी स-फला आतां ती गुणवती प्रिया गमली २१
सुत-जन्म-निमित्तें त्यापाशीं सानंद देणगी द्याया।
कस्तूरीविण नव्हतें स्व-जनांस ह्मणे ह्मणून ती घ्या या ॥ २२
कस्तूरिका-सुगंधापरि पसरो कीर्ति हें धरापाळ।
वदला निज तनयाची देवा राखी मदीय हा बाळ ॥ २३
दे पूर्व-दिशा जैशी जन्म रविस जन सुखी करायासी।
सय्यद-तनुजा तैशी निजपुत्राही सलोक[२] रायासी ॥ २४
किंवा महा-मती ते प्रसवे लोकीं जशी प्रबोधास।
सय्यद-बालाहि तशी सुतास जो कीर्तिचा वर निवास[३] २५
राज्य-वियोगें विव्हळ पाळी प्रेमें परि स्व-पुत्रातें।
राहूनि उमरकोटीं माय हमीदा श्रितातपत्रातें[४] ॥ २६
दुःखांत सुखें येती सुखांत दुःखें अनेक संसारीं।
सुख[५]दुःख-गुणीं विणला पट[६] वाटे पूर्ण हा चमत्कारीं ॥ २७
निज-सुत-मुख-चंद्राला विलोकितां तात-मानसीं भरती।
आनंद-सागराचे तरंग मोठे अंतर्ण्यें ती भरती ॥ २८

---

१ ( दव + आर्त ) वणव्यानें पिडलेल्यास. २ लोकांस इवर्तमान. ३ ठिकाण. ४ आश्रितांस आतपत्र ह्मणजे छत्र अशा. ५ सुख-दुःख-रूप तंतूंनीं. ६ संसाररूप वस्त्र.

साकी.

समदृष्टीचें क्रीडा[१]-मंदिर पुढें गमे जो लोकां ।
तत्संगतिनें संकटांतही होई माय वि-शोका[२] ॥ २९
वैरि-जनांप्रति देणारा जो निजोद[३]योत्तर झोंके ।
पाळण्यांत त्या ठेवुनि देई धा[४]त्री हळु हळु झोंके ॥ ३०
जयास पुढती स-हृद[५]य कवि-जन गातिल विसरुनि भानें ।
तया कौतकें ललना गाती गीतें आनंदानें ॥ ३१
यदानने[६]ंदुसि बघुनि विमोहक रमतिल सुंदर कांता ।
मांडीवरि तो पडुनि आइच्या रमवी तत्स्वांता ॥ ३२
शत्रु-विनाशें तद्रमणींच्या नयनांतुनि असुं ढाळी ।
मोदबाष्प तो डोळ्यांतुन तैं निज मातेच्या गाली ॥ ३३
राज्य-पदावरि पुढें बैसतां पाळिल बहु लोकां जो ।
त्यापर-देशीं गुप्त पाळिलें जन निय[७]तिस नावाजो ॥ ३४
व्यजनें परिजन जयास वारा घालिल शीतळ मंद ।
मातेचे त्या अंकीं लागति दुःखोच्छ्[८]वास अमं[९]द ॥ ३५
स्वरिपु मारणें रणांगणीं जो तत्सु[१०]हृदां रडवील ।
तो निज-मातेसमीप रडला यद्यपि बाल सुशील ॥ ३६

दिंडी.

माय बोले आपणाशींच त्याची । बाळ माझी संपदा हेच साची ।
हरो इजला कोणी न वैरि चोर । दिवस भाग्याचे खचित पुढें थोर ३७

---

१ विलास–गृह. २ दुःखरहित. ३ आपण भरभराटीस आल्यानंतर ४ दाई. ५ रसिक. ६ ( यत् + आनन + इंदु ) ज्याच्या मुखचंद्रास. ७ भाग्यास. ८ पंख्यानें. ९ मोठे. १० त्यांच्या मित्रास.

देव-करूणा-नौकेंत तनय नांदे । भीति त्याला काय आनंद-कंदें ॥
करीं धरितां वाहेल संकटांत । तरी उडविल पर्वतातेंहि वात ॥ ३८
पुत्र माझा होऊन चक्रवर्ती । प्रजेची निज करिल हो इष्ट-पूर्ति ॥
दुःख आतां तरि सौख्य पुढें पाहे । बळें चेंडू ताडितां उसळताहे ॥
दुःख आधीं मग सौख्य भाग्य मोठें । मत्सुताचें आमच्याहून वाटे ॥
जीव कंठी काळ कीं नष्ट आशा । सुखे वाटे पावेल दुःख नाशा ४०
बाबराचा पौत्र हा पुढें कष्ट । पारतंत्र्याची स्थिती क्रमिल नष्ट ॥
घडेना हे गोष्ट हो कदाकाळीं । वसे कैसा मृग-राज तो शृगाळीं ४१
बाबरानें लाविला राज्य-वृक्ष । गगनचुंबी विस्तार भव्य दक्ष ॥
कांहिं दिवशीं पावेल बद्ध-मूल।करित असतां अधिकार, आज मूल ४२

उपजाति.

ऐशारिती आक्बर वृद्धि पावे । भीमापरी पुष्ट-तनु स्वभावें ॥
बलाढ्य चाले कलभांसमान । विधूम अग्नी जणु भासमान ॥ ४३

## हुमायूनास पुन्हा राज्यप्राप्ति.

हुमायुनें मेळविली स्वसेना । जिच्या सवें शत्रु लढूं धसेना ॥
जी वाढ घेई नवें-वीर-योगें । महा-नदीशीच सरित्प्रसंगें ॥ ४४
शौर्यें नवा भास्करसा स्व-पुत्र । बैरामसेना-पति आत्म-मित्र ॥
स्वयें तिजा त्यांसह तो निघाला । घालावया वैरि-जनीं स्वघाला ४५

---

१ आनंदाचा कंदच अशा देवानें. २ सार्वभौम राजा. ३ इच्छिलेलें पुरविणें. ४ नातु, मुलाचा मुलगा. ५ सिंह. ६ कोल्ह्यांत. ७ ज्याच्या मुळ्या खोल जाऊन बळकट झाला आहे असा. ८ जो आज मूल आहे. ९ पुष्ट आहे तनु म्हणजे शरीर ज्याचें असा. १० हत्तीच्या छाव्यासारखा. ११ ज्याला धूर नाहीं असा. १२ नवीन वीर येऊन मिळाल्यानें. १३ नद्या येऊन मिळाल्यानें. १४ बैरामखान. १५ आपल्या.

शिकंदराचें वर सैन्य त्यांनीं । सोत्साहतें जिंकुनिया तिघांनीं ॥
तया भयें लाविथलें पळाया । पावे पुन्हा दिल्लि-पदास राया ॥ ४६

मालिनी.

पुरवि नृप-वराची वासना देव-राय ।
तनय-विधु[1] विलोकी दे तया खेंव[2] राय ॥
अनुभवि सुख-पारावार[3] तो बाबराचा ।
तनय अतिथि[4] झाला मृत्युच्या मंदिराचा ॥ ४७
अवनि-पति दरिद्री आणि संपन्न धीर ।
गुण-मणिमय विद्या-देवतेचें अगार[5] ॥
चतुर सुखिवर स्त्री कीं पुमान्[6] हा न भेद ।
धरि निज-गृहिं नेतो मृत्यु जीवा अखेद ॥ ४८
निज-जनक-मृतीनें[7] शोक-संतप्त-गात्र ।
हृदयिं परम झाला व्याकुल प्रेम-पात्र ॥
अकरुण[8]-विधि-योगें आमचें छत्र गेलें ।
दिन अ-सुखद कैसें पुत्र बोले उदेलें ॥ ४९
हृदय बहुत झालें शोक-पूरीं उदास[9] ।
तनयहि निज कैसे मित्र आणीक दास ॥
त्वरित सहज गेला तोडुनि प्रेम-पाशा ।
त्यजुनि जननि तेही भान[10] नेते निराशा ॥ ५०

---

१ पुत्र हाच चंद्र. २ आलिंगन. ३ सुखाचा समुद्र. ४ मृत्युच्या मंदिराचा अतिथि झाला ह्मणजे मेला. ५ मंदिर. ६ पुरुष. ७ आपल्या बापाच्या मरणानें. ८ निर्दय-अशा दैवयोगानें. ९ खिन्न. १० शुद्धि-सावधपणा.

आर्या.

पाणिपताख्य ग्रामीं दुर्धर-रण-रंगधीर[1] ये हेमू[2] ।
दिल्ली-पद जिंकावें ह्मणुनि सवें घेउनी प्रचंड चमू ॥ ५१
ती माजी बहु होते वारण[3] परवारणांत[4] दक्ष रणीं ।
ज्यांनीं केली होती पंकिल[5] गंडच्युतें मदें[6] धरणी[7] ॥ ५२
मोठ्या तोफा भासति भ्यासुर तीं मृत्युचीं जणों तोंडें ।
पाहुनि त्यास अरीचा भयें मनांतील धैर्य-नग मोडे ॥ ५३
वार्ता ऐकुनियां ही भीम-पराक्रम नरेंद्रसुत वेगें ।
बैरामासह सेना घेउनि ये निज तदा अनुद्वेगें[8] ॥ ५४
जाळी शुष्क वनाला वणवा संक्षुब्ध[9]-वात-युत वाटे ।
त्या कीं ग्रीष्मग तापें हेमूचें सैन्य हेंच सर[10] आटे ॥ ५५
तोडी बाबर-वंशज सखड्ग गज शैल स-पविवासवसा[11] ।
अल्प वयांतहि ज्याच्या ह्मणती सद्गुण निवास[12] योग्य वसा ५६
केव्हां केव्हां गज-रदिं[13] उठती ठिणग्या कृपाण-पातांनीं[14] ।
त्या गमति अकबराच्या प्रताप-वैश्वानरोत्थ[15] कवि वानी ॥ ५७

---

१ रणभूमीवर धीट असा. २ हा महमदशहा सूर आदिली ह्याचा मुख्य प्रधान होता, हा जातीचा हिंदू होता. ३ हत्ती. ४ शत्रूचें निवारण करण्यांत. ५ चिखलाची. ६ मदोदकानें. ७ जमीन. ८ (अन् + उद्वेग) उत्साहानें. ९ सोसाट्याच्या वाऱ्यासहित. १० सरोवर. ११ वज्रासह अशा इंद्रासारखा. १२ '(हा) निवास' येथें हा याचा अध्याहार आहे. १३ हत्तीच्या दातावर. १४ तलवारीच्या आघातांनीं. १५ (प्रताप + वैश्वानर + उत्थ) पराक्रमरूप अग्नीपासून उत्पन्न झालेल्या अशा.

तेजें तमांस नासुनि दिनकर उदयासि तेवि तो पावे ।
जय नृप-पुत्र सुलक्षण रिपु-नाशें ज्यास कविवरीं गावें ॥ ५८
वीराचा बाण बहू तीव्र शिरे हेमुच्या रणीं नयनीं ।
होतां मूर्छित धरिला बैरामें होउनी प्रसन्न मनीं ॥ ५९
उरलेले सैन्यांतिल पळतां ते भासती ससे वीर ।
होते पराक्रमी परि पति नसतां राहिला नसे धीर ॥ ६०
बैरामें हेमूतें विपद्गतातेंहि अकबरा निकट ।
नेलें सांगे खड्गें गाजी शिर तोडि ह्मणुनि घे प्रकट ॥ ६१
माझ्या पवित्र असिला रक्तें याच्या कधीं विटाळीं न ।
श्लाघ्य नसे मृतमारण बोलुनिया हें वसे उदासीन ॥ ६२
बैरामें क्रोधानें एकिकडे नेउनी तया वधिलें ।
अमृतोपम नाथाचें अविचारानें हितोक्ति नायकिलें ॥ ६३
करुणासागर अकबर आयकुनी कोपला परी लपवी ।
निज मानस कीं नोहे समुचित हा काळ कोप-शैल-पवि ॥ ६४
कीर्ति जयश्री वरिती ज्या तो नृपसुत वरावया तिसरी ।
त्वरीशीच राज्य-लक्ष्मी स्वपुरा ये हर्ष थोर पौरें वरी ॥ ६५

## अकबरास राज्य-प्राप्ति.

### उपजाति.

तयावरी चामर छत्र वेत्र । सौवर्ण सिंहासन पद्म-नेत्र ॥
किरीट रत्नांकित राज-चिन्हें । स्वीकारि तो तीं हृदयें प्रसन्नें ६६

---

१ अंधारास. २ तलवारीस. ३ मेलेल्यास मारणें. ४ ( हित + उक्त ) हिताचें वचन. ५ कोपरूप पर्वतास केवळ वज्र असा. ६ नागरिक लोक. हें जातिवाचक एक वचन घातलें आहे. ७ चवरी. ८ चोपदाराची सोन्या-रुप्याची काठी. ९ सौवर्ण=सोन्याचें.

पंक्ती महा-मांडलिकांनृपांची । तशीच सर्दार वरिष्ठ यांची ॥
स-भूषणा सोज्वळही सु-वस्त्रा । सवेग ओढी जन-नेत्र[1]मात्रा ॥ ६७
धरा[2] पहायास सुरेंद्र[3] आला । जणो धरेचा पति मानसाला ॥
स-देव सर्दार-नृपांत वाटे । सभा अशी ते परिपूर्ण थाटे ॥ ६८
जिथें तिथें मंगल[4]तूर्य वाजे । मोठा समारंभ पुरांत साजे ॥
गंभीर गाजे स्वन[5] नौबदीचा । आनंद दावी जनता-मनींचा ॥ ६९
शृंगारलेले गज-संघ काळे । प्रभा झुलींची पिवळी उजाळे ॥
सौदामिनी-कांति-विशिष्ट मेघ । सहर्ष तैसे बघती जनौघ ॥ ७०
किंकाट त्यांचे श्रवणांत येती । गंभीर वाटे घन-गर्जना ती ॥
शुंडाग्रिंचे हार तदा फुलांचे । गळ्यांत ते घालिति माहुतांचे ॥ ७१
घोडे जवानें पवनास मागें । जे टाकिती धांवति संभ्र[6]मानें ॥
सालंकृ[7]ती चित्र-विचित्र-रंगी । साश्चर्य तत्प्रेक्षक अंत[8]रंगीं ॥ ७२
वि-कोश[9] सादी[10] तलवारि हातीं । घेऊन रांगेंत उभे रहाती ॥
त्यांच्यावरीतैं रवि-कांति नाचे । शोभा वि-चित्रा वदवे न वाचे ७६
दिल्ली-पतीचे वर मांडलीक । जे पातले तेथ तदा अनेक ॥
सभोंवतीं तन्नव[11]-वस्त्र-वेश्मीं । वाटीच वाटे पुर दिव्य[12] पद्मीं ॥ ७४
उभारलेले ध्वज उंच लोकां । शिरें निजें डोलवुनी विलोका ॥
जाणों स्वयें जाणविती महीप । वरील कीं उन्नतता उमोप[13] ॥ ७५

---

१ लोकांच्या सर्व नेत्रांस. २ पृथ्वी. ३ ( सूर + इंद्र ) देवतांचा राजा. ४ मंगल वाद्य. ५ नाद. ६ घाईनें, वेगानें. ७ ( स + अलंकृती ) अलंकारास-हवर्तमान. ८ मनांत. ९ म्यानांतून काढलेल्या. १० घोडेस्वार. ११ त्यांच्या नवीन डेरे राहुट्यांच्या मध्यभागीं. १२ सुंदर कमलांत. १३ पुष्कळ.

श्रीमंत तेथील दुकानदार । ते जोहरी मांडुनिया अ-पार ॥
रत्नें हिरे आणिक पाच मोतीं । रत्नाकरत्वा उघडें करीती ॥ ७६
स्वांता[1] जनांच्या नगरीच राका[2] । नृपाधिपा[3] जी धरिते मृगांका ॥
स-तेज नारी नर हेच तारे । ज्योत्स्ना[4] स्व-संतोष अ-सीम[5] सारें ७७
गळयांत मुक्ता-फल-लंब-हार[6] । किरीट माथां[7] रमणीय फार ॥
आंगीं झगा सुंदर भर्जरीचा । तेजाळ शोभा-भर[8] भूपतीचा ॥ ७८
नृपावरी चामर दिव्य होतें । जे भृत्य संचारक[9] आत्म-हातें ॥
ढाळीत होता, सुचवी जनां तें । कीं तो निवारीलचि संकटातें ७९
छत्र स्वयें भव्यहि भाव दावी । ज्याची अवर्ण्या किति भा[10] वदावी ॥
कीं बादशाहा जनतेस ताप । न होउं देणार कधीं अपाप ॥ ८०
सुरेख सौवर्ण सु-वेत्र दंड । तो जाणवी लोक-मना अखंड[11] ॥
हा भूप-चूडामणि योग्य शिक्षा । देईल दंड्यां[12] करुनी परीक्षा ॥ ८१
योग्यास हा देइल योग्य जागा[13] । राज्यांत कामें करण्यास जागा ॥
जो कीर्ति-संपादन-कर्मि राहे । सिंहासनें ज्ञापित अर्थ आहे ॥ ८२
या चक्रवर्ती प्रति नित्य वंद्य । होतील सारे शिरसा वि-हृद्य[14] ॥
ज्ञानी खरे धार्मिकही महात्मे । स्पष्टार्थ हा होय शिरोललामें[15] ॥ ८३
कंठ्या हिऱ्यांच्या, नव-मौक्तिकांचे । हार प्रभा-भूषित दिव्य साचे ॥
पोषाक मोठे बहु जे पसंत । अहेर होतीहि सभा-गृहांत ॥ ८४

---

१ स्वांता-अंतःकरणास. २ राका = पौर्णिमा. ३ ( नृप + अधिप ) नृपश्रेष्ठास. ४ चांदणें. ५ अमर्याद. ६ मोत्यांचे लांब हार. ७ मस्तकावर. ८ शोभेचा अतिशय. ९ संचारक = फिरविणारा. १० शोभा. ११ एकसारिखें. १२ शिक्षेला पात्र अशा लोकांस. १३ अधिकार. १४ फार चांगले. १५ ( शिरस् + ललाम ) मस्तकावरील भूषणानें = मुकुटानें.

माता हमीदा स-विशेष[1] हर्षें । सानंद नेत्रांतुन आश्रु वर्षे ॥
लोटांगणानें परमेश वंदी । त्याची स-भाग्या तइं होय बंदी[2] ॥ ८५
न स्वार्थ[3] ज्यामाजि असें नसेच । खरें दुजें प्रेम जगांत साच ॥
जें माय आत्मीय सुतीं करीतें । ब्रह्मांड तेणें विसरून जाते ॥ ८६
वंदी पदां तो निजजन्मदेचे[4] । ज्यांच्या नतीनें[5] सुत-पाप वेचें[6] ॥
जोडी तदाशीर्वच[7] दिव्य दुर्ग । जें त्यास राखील हरून दुर्ग[8] ॥ ८७
जे चांगले नंदन[9] मातृ-भक्त । लोकोत्तरत्वें[10] असतात शक्त ॥
करावया दुष्कर थोर कर्मे । होती मही-भूषण पुत्र-धर्में ॥ ८८

## अकबराचें स्वरूप व स्वभावादि गुण.

वसंततिलका.

छाती असे बहु मनोज्ञ[11] विशाल पुष्ट ।
वाटे जसें सुबक थोर कपाट घट्ट ॥
दोर्दंड[12] ते विलसती जणु जाड सर्प ।
कीं अर्गळाच[13] सुदृढा जित[14]-शत्रु दर्प ॥ ८९
तैसेंच उंच रमणीय कपाळ शोभे ।
आ-कर्ण नेत्र-युग पाहुन चित्त लोभे ॥
मुद्रेस शोभवि अशी सरला सुनासा ।
जेथें विलक्षण सदा करि तेज वासा ॥ ९०

---

१ अतिशय. २ स्तुतिपाठक. ३ स्वहित. ४ आपल्या आईचे. ५ नमस्कारानें. ६ नष्ट होते. ७ तिच्या आशीर्वादाचें वचन हाच उत्तम किल्ला. ८ संकट. ९ पुत्र. १० लोकांहून विलक्षणपणानें. ११ सुंदर. १२ बाहुदंड. १३ अडसर. १४ जिकला आहे शत्रूचा गर्व ज्यांनीं असे.

बांधा सुरेख कमनीय[1] गव्होळ[2] वर्ण ।
जात्यां[3] रसाळ वचनें प्र-वि-भक्त[4]-वर्ण ॥
आ-जानु-बाहु[5]पण सुंदरता मुखाची ।
भूपाळ-हीर गमला खनि तो सुखाची ॥ ९१
वाटे जनास नृ-पती जणु देह[6]धारी ।
झाला पराक्रम खरोखर कार्यकारी ॥
रूपें स्वयें वि-जित[7]-मन्मथ-रूप होता ।
तेणेंचि [8]तोही अनुकूल जमे सभोंता ॥ ९२
तो सार्वभौमनृप निर्जर[9]-नाथ मानी ।
पीयुष सत्य रत सेवनिं तो जनांनीं ॥
होता तदीय तरि सेवियला जपून ।
साल्हाद चंद्र रमवी हृदया अ[10]नून ॥ ९३
होता गुणज्ञ वर-धीर अ[11]-भीक गाजी ।
युद्धात योधे[12] तरि त्यास सदाहि राजी ॥
दावी स्व-निर्भयपणा समरांत[13] लोकां ।
तो आपणासम करी यश घे विलोका ॥ ९४
खोटें खरें मिसळुनीहि समोर येतां ।
त्यांची करी निवडणूक चुकी न होतां ॥

---

१ रम्य. २ गव्हासारखा तांबुस गोरा. ३ स्वाभाविकपणें. ४ निरनिराळीं विभागलेलीं आहेत अक्षरें ज्यांतील. ५ गुडघ्यापर्यंत लांब हात असणें. ६ मूर्तिमंत. ७ जिंकिलें आहे मन्मथाचें (मदन) रूप ज्याणें असा. ८ जन. ९ देवेंद्र १० (अनू + ऊन) पूर्ण. ११ अ = नाहीं भी = भय ज्यास असा. १२ योद्धे. १३ युद्धांत.

तन्मिश्रणांतुन करी जल दुग्ध भिन्न ।
तो हंससा नृ-पति-हंस मनें प्रसन्न ॥ ९५
मानी[1] असून बहु मानद[2] भूप-शक्र[3] ।
जिंकी रणीं सहज धीर अ-मित्र-चक्र[4] ॥
मानें करून परि त्या पदरींच राखी ।
मित्र प्रसन्न-हृदयें गणि त्यास शेखीं[5] ॥ ९६
तन्मानसेंदु न दुराग्रह-रूप राहू ।
ग्रासूं शके परम उत्सुक त्यास पाहूं ॥
नाना-मती बहुत धार्मिक त्यासमीप ।
येती तरी अ-चल तन्मतिचा प्रदीप ॥ ९७
लोकांस पाहुनि सुखी स्वमनीं सुखी तो ।
दुःखें तदीय बहु दुःख-विशिष्ट[6] होतो ॥
ऐशा न कोण जन-हर्ष-विवर्धनास[7] ।
गातील सत्कवि मनांत धरून हौस ॥ ९८
जे जे ह्मणून गुण थोर नृपाग्रणींत[8] ।
आवश्यकांत गणिले असती पसंत ॥
ते तेहि ह्या नृ-प-करंडींत[9] सन्मणीसे ।
होते सु-पूर्ण भरलेगुण-सिंधु भासे ॥ ९९
भू-मंडलीं नृ-पति योग्य कसा असावा ।
सच्छाय वृक्षचि उन्हांत तसा विसावा ॥

१ योग्य अभिमानी. २ दुसऱ्यास मान देणारा. ३ राजेंद्र. ४ शत्रुमंडल ५ अखेरीस. ६ दुःखानें युक्त असा. ७ लोकांचा आनंद वाढविणारास. ८ नृपांच्या नायकांत. ९ राजा हाच करंडा यांत.

तत्तांस, या प्रकट देउनि जन्म देवें ।
केलें जनीं सकल-विश्रुत[1] हें सु-दैवें[2] ॥ १००
होता नृपाल बल-सागर थोर शूर ।
क्रूरत्व त्यांत नव्हतें ह्मणती उदार ॥
यत्नेंकरून जरि वाढवि राज्य-लक्ष्मी ।
त्याच्या न लोभ वसला हृदयाख्य-सद्मीं[3] ॥ १०१
होता जरी गृहिं असे तइं तो विलासी ।
बाहेर वेळ पडतां श्रम फार सोसी ॥
ज्ञानी, धनी, चतुर फार, न गर्व वाहे ।
कोपे विशिष्टसमयीं[4] परि शांत राहे ॥ २
जाणे कुशाग्र[5]-मति तो मनुज-स्वभाव ।
वर्ते तसा कुशल दक्ष वर[6]-प्रभाव ॥
होता वशीकरण-मंत्रहि हाच पाठ ।
चाले अमित्र नव मित्र बनून पाठ[7] ॥ ३
जाणे न केवळ मनें नृप मानवांचीं ।
तो धूर्त तत्परिचयांत गजादिकांचीं[8] ॥
झोंबी बलाढ्य करि व्याघ्र-रिसांसवेंही ।
आहे गमे सकळिकांप्रति वज्रदेही[9] ॥ ४

---

१ प्रख्यात. २ भाग्यानें. ३ मनोमंदिरांत. ४ विशेषप्रसंगीं. ५ दर्भाच्या अग्रासारखी (सूक्ष्म) आहे बुद्धि ज्याची असा. ६ श्रेष्ठ आहे तेज ज्याचें असा. ७ क्रम (शत्रु नवा मित्र बनण्याचा.) ८ हत्ती वगैरे पशूंचीं. ९ बळकट शरीराचा.

मोठ्या जवें अ-चुक तच्छर लक्ष्य साधी ।
तो ह्या गुणें वनिं सदाहि शिकार वेधी ॥
या सत्कर्में नृप करी चल-लक्ष्य[१] भेद- ।
विद्या स्वहस्त-गत तो हृदयें अ-खेद ॥ ५
निष्णात तो जरि कलांत रणोपयोगी ।
होता धरोप[२] रण[३] वांछि न अंतरंगीं ॥
जैं तें, तया परम संकट लेखि आलें ।
कीं तद्दयार्द्र[४] हृदयीं सुविचार चाले ॥ ६
कोणांतलाहि गुण सेव्य[५] तयास इष्ट ।
दुर्लक्ष्य तो करि तदीय गुणीं अनिष्ट ॥
सौगंध्य[६]-लाभ वरि पंकजिं[७] थोर भृंग[८] ।
पंकाकडे[९] न मन दे सुगुणांत दंग ॥ ७
राजा लहान परि तो मति-वैभवाचें ।
सत्क्षेत्र[१०] विस्तृत सखोल अवर्ण्य वाचे ॥
बीजें तिथें, शतगुणें[११] गुरु योग्यकालीं ।
जीं लावि तीं सकल जोम धरून आलीं ॥ ८
सर्वज्ञता जरि गुरूंत असेल थोडी ।
शिष्य प्रबुद्ध तरि पैल थडीस जोडी ॥
विद्या-समृद्धि, नृप हा असलाच होता ।
मोठा विलक्षण यशास गुरूसि देतां[१२] ॥ ९

---

१ चंचल निशाण मारण्याची विद्या. २ राजा. ३ रण. ४ त्याच्या दयेनें स्निग्ध अशा अंतःकरणांत. ५ ग्राह्य. ६ सुगंधाचा लाभ. ७ कमलांत. ८ भुंगा. ९ चिखलाकडे. १० चांगलें शेत. ११ शंभर पटींनीं. १२ देणारा.

# बैरामखान.

## स्रग्धरा.

बापाचा आकबराच्या तरतरित असा मित्र विश्वास-पात्र।
तारी त्या संकटाच्या उदधितुनि महा-धीरधी[1] भव्य-गात्र।
आपत्कालीं विसंबे न कधिं नर-मणी आपल्या जो धन्यास।
तो पुण्य-श्लोक[2] होतो स्तुति-पद समयीं आणि लक्ष्मी-निवास[3] १०
आधीं तो भूपतीचा गुरु मग बरवा होय मुख्य प्रधान।
तद्राज्याच्या प्रतापी निरलस शकटा[4] चालवी सावधान।
सेना त्यानें स्वताला वश बलनिधिनें[5] मोगलांचीहि केली॥
धाके सर्दार-पंक्ती नृपति-हृदयिंची काळजी दूर नेली॥ ११
राजा त्या 'खानखानान*' वितरि दुसरी आणखी 'खानबाबा§'।
देई प्रेमें पित्याशीं सम मनिं, पदवी, मान त्याचे जबाबा[6]॥
क्रोधें हुंकार टाकी तइं रिपुंस करी आपल्या त्यक्त-दर्प।
भासे सर्वां सुपर्ण[7] प्रबल सचिव हा घोर ते[8] सत्य सर्प॥ १२
ताताचा मित्र, सेनापति, सबळ[9] हरी[10] वैरि-दंतीस[11] युद्धीं।
कोठें ज्याची अडेना अडचण असतां राज-कार्यीत बुद्धि॥
पोषी ज्ञानामृतें तो निजमतिस[12] असें वंद्य सर्वांत नातें॥
आणूनी हें कृतज्ञ स्व-मनिं नृपवरें सोशिलें इष्ट ना तें॥ १३

---

१ मोठ्या निर्भय बुद्धीचा. २ पुण्यकारक आहे यश ज्याचें असा पुरुष. ३ संपत्तीचें वसति-स्थान. ४ गाड्याला. ५ बळाचा केवळ ठेवाच अशा बैरामानें. * मोठा पूज्य गृहस्थ. § बापाप्रमाणें मोठा. ६ वचनास. ७ गरुड. ८ रिपु ( शत्रु ). ९ सामर्थ्यानें सहित असा. १० सिंह. ११ शत्रुरूप हत्तीस. १२ आपल्या ( आकबराच्या ) बुद्धीस.

राजा होता लहान प्रमुखपण तरी राज-कार्यांत पावे ।
ठेवोनी अंजलीतें शिरिं सकल जनींही तदाज्ञे जपावें ॥
संताप-ग्रस्त होतां अ-दयपण धरी भूपही तो न मोजी ।
सत्ताधारी विवेकें रहित जरि तरी प्राज्ञही अंध होजी ॥ १४
क्रोधी मानव अल्प-कारणवशें क्रोधाख्यखड्गें सदा ।
चित्तींची निज शांति-वल्लि सहसा ते कांपिती सौख्यदा ॥
स्नेहाचीं कुसुमें न त्यांस मिळती आनंद-सौगंध्य जीं ।
देतीं नित्य अवर्ण्य आणि पडती दुःखीं परीवादजीं[1] ॥ १५
राजेंद्रा इष्ट त्यानें कितिक नर असे मारिले, दूरदेशीं ।
आज्ञेवांचून तैसे कितिकहि दुसरे धाडिले प्रेम-राशी ॥
मोठाही मत्स्य सांगा जलनिधि-जल तें दूर सोडून कैसा ।
जीवा राखील वेडा? क्रम धरि भलता सत्य बैराम तैसा ॥ १६
तेणें द्वेषें प्रधाना प्रिय सहज नृपा लोक ते फार होती ।
घ्यावी हातीं स्वताच्या अधि-कृति ह्मणती त्यास संतोष देती ॥
धात्री माताहि मान्या कृति-कुशल-वरा बोध जात्यां[3] करीती ।
त्या तो राजी प्रबुद्ध प्रमुदित हृदयीं जाहला नैकरीती[4] ॥ १७

## शार्दूलविक्रीडित.

आज्ञेवांचुनि त्यांत दुष्कृति अशी होतां मनीं कोपला ।
राजाचा आव-मान गोष्ट न बरी आतां नसे हा[5] भला ॥

---

१ निंदेपासून उत्पन्न होणाऱ्या अशा. २ बैरामानें ३ जातीनें, स्वतां. ४ अनेक प्रकारांनीं. ५ बैराम.

ऐसा आणुन सद्विवेक हृदयीं भूपाल-संघाग्रणी[१] ॥
घे हातीं निजराज्य-सूत्र अवघें वाखाणिला सज्जनीं ॥ १८

स्रग्धरा.

गेला दिल्ली-पुरीतें प्रकट जनिं करायास हा भुप-वर्य ।
हेतू आदेश[२]-पत्रें अधिकृत[३] पुरुषां पाठवी साध्य[४]-कार्य ॥
बैरामातेंहि धाडी विष[५]-विषम असा स्वीय[६] आदेश हा कीं ।
जावें मक्केस जीतें यवन गणिति सन्मार्ग जायास नाकीं[७] ॥ १९
धाडी, पावेल पैसा नियमित समयीं धर्म-कृत्यें कराया ।
प्रांतींचा नेमिलेल्या विपुल तुजकडे हा असा लेख राया ॥
डोळां बैराम पाहे निजमनिं खवळे व्याघ्र कीं सिंह सर्प ॥
किंवा मोठ्या तुफानीं, दवदहन[८] वनीं, सिंधुसा तो सदर्प ॥ २०
कोपें आरक्त डोळे करुनि मग ह्मणे, बोलतां ओठ कांपे ।
रायाला पाय आतां सहजच फुटले, वाढला मत्प्रतापें ॥
त्याची वार्ताहि नेणे त्वरित मज वदे आज एथून जाणें ।
त्याचें खोटें[९] परी हीं[१०] प्रबळ परतवीना कसें त्यास नाणें ॥ २१

शार्दूलविक्रीडित.

विद्या मी दिधली तया स्वकृतिनें त्याणें तियेचें फळ ।
थोड्याशा समयांत आजचि दिलें आहे मला पुष्कळ ॥

---

१ राजांच्या समुदायांत श्रेष्ठ. २ आज्ञापत्रें. ३ अधिकारावर ठेवलेल्या. ४ ज्याला कार्य साधावयाचें आहे असा. ५ विषासारखा भयंकर. ६ स्वतःचा. ७ स्वर्ग लोकांत. ८ दव नांवाचा अग्नि—वणवा. ९ हें नाण्याचें विशेषण. १० मी बैराम.

क्रोधाग्नी मज जाळितो प्रखर तज्ज्वाला न सोसे जिवा ।
याचा सूड रणांत जिंकुनि तया घेईन घ्यायां[1] शिवा ॥ २२

पृथ्वी.

प्रचंड मग तो करी प्रखर बंड संतापला ।
वनासवन-वन्हिनें विषय[2] तो तसा व्यापला ॥
परि प्रबळ आकबरें नव[3]-घनें वळोनी तिथें ।
पराक्रम-जलें तया शमविलें सुखें सत्पथें ॥ २३

शार्दूलविक्रीडित.

केलेले उपकार आठवि मनीं भूपाळ-चिंतामणी ।
दोषातें न गणून थोर हृदयें सन्मान्य लोकाग्रणी ॥
मक्केला मग पाठवी व्यसु[4] परी मार्गांत केलें तया ।
पुत्रें[5] तातवध स्मरून मग तो घालों ह्मणे निर्दया[6] २४
वाटे प्राण जसा तसा प्रिय मना जो मानवाच्या नर ।
आतां प्राप्त घडीस तोच पुढच्या[7] वि-द्वेष्य[8] जैसें गर[9] ॥
ह्याचा व्युत्क्रमही[10] कधीं जगिं जना येतो असें[11] प्रत्यया ।
प्रेमाप्रेमहि चंचलत्व धरितें सिद्धांत हा सत्य यां[12] २५
एका सद्गुण आपले अणु तरी ते पर्वता एवढे ।
मोठे भासति हृत्पटीं निज पहा आश्चर्य हें केवढें ॥

---

१ कल्याण करून घेण्यास. २ देश. ३ नवीन मेघानें. ४ ( वि + असु ) प्राणहीन. ५ बैरामानें एका अफगाणास मारिलें होतें त्याच्या मुलानें. ६ निर्दय बैरामा. ७ पुढल्या ( घडीस-घटकेस. ) ८ तिटकारा येण्यासारखा. ९ विष. १० उलटापालट. ११ याचा कर्ता 'सिद्धांत.' १२ याचा अन्वय 'जगीं' या शब्दाकडे.

त्यांलागीं परकीय थोरहि खरे ते[1] मोहरीचे परी ।
दोषांतें उलटें गणीति मतिची भासे वि-चित्रा परी[2] ॥ २६
ओठीं एक मनांत ठेवि[3] भलतें हें मानवी तत्व या ।
गोष्टींत प्र-वि-भक्त होउनि दिसे वाटे असें कासया ॥
आत्मेच्छा बहु दाविली कितिकदा मक्केस जातों अशी ।
बैरामें, परि भूप 'जा' जइं ह्मणे क्रोधावला मानसीं ॥ २७

शालिनी.

राजा मंत्री भांडतां जो बलिष्ठ ।
सत्वें[4] मोठा तो ठरूनी वरिष्ठ ॥
प्रेमें माला घालि त्या राज्य-लक्ष्मीं ।
अन्या तेणें स्पष्ट येते अ-लक्ष्मी[5] ॥ २८

उपजाति.

भूप-प्रधानात्मक दोन चक्रीं । चाले जवें सुंदर राज्य[6]-गंत्री ॥
प्रधानचक्रांत बिघाड होतां । तें जाउनी ये नव तेथ आतां ॥ २९
बैराम मानी नृप हा लहान । वयाकडे लक्ष्य[7] गुणीं न हानि[8] ॥
दे, पावला सत्य अ-दूरदर्शी[9] । तेजीं वयाच्या न महत्व वर्षीं ३०
करींद्र भावी मद-मत्त मोठा । मृगेंद्र तो सान[10] विचार खोटा ॥
मोठेपणा आकृतिला धरून । राहे न तेजासि खरा अनून ॥ ३१

---

१ सद्गुण. २ रीत. ३ ह्यास कर्ता अध्याहृत 'मनुष्य.' ४ धैर्यानें. ५ संकटावस्था, दारिद्र्य. ६ राज्याची गाडी. ७ हें 'दे' या क्रियापदाचें कर्म. ८ हानि. हें 'पावला' याचें कर्म. ९ दूरवर न पाहणारा. १० लहान.

स्नेही नृपाचे जननीहि धात्री । तो[1] प्रेमभावा धरि ह्या सुपात्रीं[2] ॥
न, तो पद-भ्रष्ट ह्मणून झाला । न नीति-नैपुण्य म्हणों अशाला ३२
सिंहास आलिंगन गाढ देणें । कीं अग्नि-कुंडांत उडीस घेणें ॥
सर्पास पायें शिवणें तसें वा । असे महा-दुर्धर राज-सेवा ॥ ३३

शिखरिणी.

मनुष्याची सृष्टी अधिक बरवी सद्गुण-गणीं ।
जशी तैशी आहे अधम-तमते दुर्गुणिं[3] गणीं[4] ॥
अहा बैरामातें रिपु-तनय मक्का-पथिं वधी ।
कराया वैराचा निज अचुक निर्यातन[5]-विधि ॥ ३४
पतीच्या घातानें प्रखरतर आकस्मिक[6] अशा ।
पडे बैरामाची धरिणिवरि शोकार्त, कुदशा ॥
जिलागांठीं, कांता दव-दहनिं ते होरपळली ।
कुरंगी[7] कीं वज्रें निहत पडली म्लान कर्दली[8] ॥ ३५
तिला बैरामाच्या जिवलग जनें भूप निकटीं ।
तदा कालिंदीच्या अति सुभगे[9] आग्रा-पुरिं तटीं ॥
त्वरेनें नेलें कीं निववील दया[10]-सिंधु तिजला ।
भुकेला प्रेमाचा सुरतरु[11]च दीनाश्रय भला ॥ ३६
अनाथांचा स्वामी स-सुत मग पाहून विधवा ।
नर-प्रारब्धाच्या[12] गहन गति चित्तीं अभिनवा ॥

---

१ बैराम. २ योग्य ठिकाणीं. ३ दुर्गुणांनीं. ४ मी मानितों. ५ सूड उगाविण्याचें कर्म. ६ एकाएकीं घडलेल्या. ७ हरिणी. ८ केळीचें झाड. ९ सुंदर. १० दयेचा समुद्र—अकबर. ११ कल्पवृक्ष. १२ मनुष्याचे दैवाच्या.

दयाब्धी चिंतूनि स्मरुनि गुण-पंक्ती बहु बरी ।
स्वयें बैरामाची उचित[1] वितरी सांत्वन करी ॥ ३७

## अकबराची स्वतंत्र राजसत्ता.

शालिनी.

पारतंत्र्य निज-मस्तक-भार । दूर टाकुन जनेंद्र उदार ॥
मोकळा त्वरित होय गुणांनीं । ग्रस्त-मुक्त[2] जन त्या रवि मानी ३८
सन्मणी जरि करंडकिं आहे । गुप्त तेज तरि तद्गत[3] राहे
काढितां तिथुन फार चकाकी । तो करी प्रकट बाहिर लोकीं ॥३९
तीन मुख्य मग हृद्गत हेतु । साधण्यास करि संकट[4]-सेतु ॥
यत्न सत्वर अ-मंद मनानें । सत्क्रिया-निरत होय जवानें ॥ ४०
शत्रुच्या परिभवें[5] निजराज्य-काननांत भर घालुनि योग्य ॥
सद्व्यवस्थिति-सुनीति-जलानें । भव्य बाग रमणीय साधणें ४१
कारभार नव-पद्धति-योगें । चालवून सगळा अनुरागें[6] ॥
राज्य-वृक्ष दृढ-बद्ध मुळांशीं । सुज्ञ हा करुं म्हणे बल-राशी ४२
जाति धर्म कलि[7]-कारण भिन्न । पथ नांदाति सदैव अ-खिन्न ॥
गोष्ट पाहुनि अशी सम-दृष्टी[8] । कल्प-वल्लिच गणी निज पोटीं ॥४३
स्वामि-भक्त बलवान् रजपूत[9] । सत्य-निष्ठ बहु सद्गुणवंत ॥
भव्य-देहें[10] अति-शूर मनाचे । देश-रक्षक असे जन साचे ॥ ४४

---

१ योग्य आश्रय देता झाला. २ ग्रहणांतून मुक्त झालेला. ३ त्यांत असणारें. ४ संकटें तरून जाण्यास पूलच केवळ. ५ पराभवानें. ६ प्रीतीनें. ७ भांडणाचें मूळ असे. ८ सारखेपणाची दृष्टि. ९ रजपूत लोक. १० धिप्पाड शरीराचे.

राज्य-रूप निज हे सदनास । स्तंभ भक्कम समुन्नत[1] खास ॥
योग्य हा नृप मनांत विचार । आणि पंडित तसाच उदार ॥ ४५
नीतिवंत अति सावध पेरी । प्रेम-बीज हृदयांत विचारी ॥
आत्मसात्[2] करि तयां चतुरांचा । आग्रणी नृप-कृषीवल[3] साचा ॥४६
प्रेम-बद्ध करि त्यां निजकार्या । लावण्या प्रति अखंड बलाढ्या ॥
प्रेम-बंधन तसें दृढ नाहीं । अन्य बंधन असें नृप पाही ॥ ४७
जे सदाहि बहुधा यवनांचे । वैरि ते जिवलग स्थिति वाचे ॥
होति हे किति अ-वर्ण्य वदावी । युक्ति-युक्त नृप कौतुक दावी ४८
बीज चंचल अ-मोघ बलाढ्य । सृष्टि-शक्ति जरि फार अ-तर्क्य
तीस योजक करी निजदासी । उंच जी चढवि त्यास पदासी ॥४९
अग्नि-वारि-पवनादि पदार्थ । सृष्ट जे वितरितात अनर्थ ॥
सेवितांच भलत्या मनुजानें । रीतिनें धराणि सोडुनि[4] जाणें ॥ ५०
ते कृती करिति तत्परतेनें । शेंकडों सुखद[5]शा जलदीनें ॥
शास्त्र विन्मति-नियोजित होतां । युक्ति देइ यश सुंदर हाता ५१
डोई[6]-पाट्टि करि बंद नृपाल । मान-हानिकर जी करवाल[7] ॥
तीव्र त्यांस गमली हृदयास । ह्याकरी नृप वशीकरणा[8]स ॥ ५२
अल्पही सुखद भूपति कार्य । जेधवा करि जनार्थ वरेण्य ॥
ते कृतज्ञपण सेवुनि होती । भूप-कार्य-रत जीवहि देती ॥ ५३

---

१ [ सम् + उन्नत ] फार उंच. २ आपलेसें. ३ राजा हाच शेतकरी ४ मरणें. ५ सुख देणाऱ्या अशा. ६ मुसलमान राजे विधर्मी लोकांपासून ' जिझीया ' कर घेत असत तो. ७ तरवार. ८ मन वळविण्याचे उपायास.

अंबराधिपति मल्ल-बिहारी[1] ॥ राज-सिंह रण-पंडित भारी ॥
भेटुनी स्व-वश त्यास कराया । जाय त्याजवळ कल्पक राया ५४
बैसला गज[2]-वरावर भूप । बाबराख्य-नृप-सत्कुलदीप ॥
अंध जो बहुत होय मदानें । काय ये निज-पथांत न जाणे ॥ ५५
बादशाह-सरदार गजास । पाहुनि त्यजिति ते स्व-निवास ॥
धैर्य[3]-शैल परि मल्ल[4] न हाले । धन्य शौर्य ह्मणुनी नृप डोले ॥ ५६
सत्परीक्षक अनर्घ्य मण्याचा । जाणतो गुण सुखास्पद साचा ॥
तो तसा तदितरांस कळेना । सुज्ञ वाँ[5]! नृपति केंवि म्हणेना ॥५७
आक्बर-प्रभु तया प्रति भेटे । स्नेह तद्धृदयिं सादर दाटे ॥
राजपुत्र यवनाधिप-सख्य । अग्नि-वायु-नव-संगम योग्य ॥ ५८
मल्ल दे-निज तया तनयेला । मित्र-भाव दृढतेप्रति गेला ॥
शक्ति मोंगल-पतींत दुणावे । ऐक्य लोकिं बल-वर्धक गावें ५९
तंतु तंतु मिळतां दृढ दोर । होय बांधि मग तो गज थोर ॥
कीं अणूस अणु लागुन होई । फार भक्कम शिला नर पाही ॥ ६०
अल्प अल्प परि कीट[6] अ-संख्य । सागरोदरिं गभीर[7] अ-गम्य ॥
निर्मिती स्व-कृतिनें धरणींचे । भाग रम्य अति विस्तृत साचे ॥६१
ज्यांवरी नद-नदी-समुदाय । उंच पर्वत वनेंहि शिवाय ॥
नांदती मनुज-संघहि राज्य । स्थापिती सुखद थोर अवर्ण्य ॥६२
कीं अपार जल-बिंदु मिळून । तो प्रचंड बनलाहि नदीन[8] ।
ज्यांमधें हिम-नगापरि थोर । राहती किति शिलो-च्चय[9] घोर ॥६३

---

१ जयपूरचा राजा बहारमल्ल. २ मोठ्या हत्तीवर. ३ धैर्याचा केवळ पर्वतच. ४ बिहारीमल्ल. ५ वाहवा. ६ प्रवाल-कीटक. ७ गंभीर. ८ ( नदी + इन ) नद्यांचा स्वामी—समुद्र. ९ ( शिला + उच्चय ) पर्वत.

तारितो किति गभीर जहाजें । वादळांत  किति  दुर्धर गजें ॥
फेकितो लहरि उंच जवानें । श्लाघ्य ज्यास कविचा गण वाने ॥ ६४
मेळ हेंच तरणें नृप मानी । फूट हेंच मरणें अभिमानी ॥
जो असा मनिं धरी सु-विचार । सार्वभौम जय तो वरि धीर ॥ ६५

द्रुतविलंबित.

नृपतिचें वय सान विलोकुनी । म्हणति ते मदमत्तपणें धनी ॥
करुनि होउं तदीय पराभव । रिपु तयार रणासि अशास्तव ॥ ६६

उपजाति.

जवानपूरावर शीरशाहा । बंगालचा नायक दूसरा हा ॥
ये चालुनी खानजमान वारा । तृणास त्या तैं उडवी असारा ॥ ६७
तुरंग वेगीं[2] मदमत्त दंती । यांच्या रणीं लाभति थोर पंक्ती ॥
अपार तैसा धन-राशि लाभे । तो स्वार्थ राखी सरदार लोभें ॥ ६८
ही बातमी शोधक बादशाहा । ये कर्णमार्गांत सवेग तैं हा ॥
गेला तया संनिध राजहंस । महा-प्रतापी स्व कुलावतंस ॥ ६९
विश्वास-घातासम पाप नाहीं । कशी तुझ्या अंतरिं कल्पना ही ॥
येना स्वपापें बुडतात लोक । सिद्धांत हा शुद्ध असे विलोक ॥ ७०
समीप ज्याच्या सरदार ऐसे । कुकर्मिं त्यातें यश सक्त कैसें ॥
धोंडेच वाटे जड हे गळ्यांत । विघ्नप्रवाहीं करिती तदंत ॥ ७१

---

१ निःसत्व अशास. २ वेगवान्. ३ आपल्या उपयोगासाठीं. ४ ( स्व- + कुल + अवतंस ) आपल्या कुळास भूषणभूत.

शब्दीं अशा तो सरदार लाजे । गंभीर-सत्वें हृदयें विराजे ॥
भूपाळचूडामणि बोधराशि । कृतानुतापें[1] मति होय खाशी ॥ ७२

इंद्रवंशा.

वर्षें पुढें तो मग खानें[2] आधम । जिंकावया मालव[3] भूपसत्तम[4] ॥
प्रेषी प्रतापी सरदार आपला । कीं तत्पती[5] होय मदांध कोपला ७३
तीक्ष्णौषधें रोग सुतीव्र हाटतो । तैसा जनां मालव-राज वाटतो
किंवा उन्हाळा सर अल्प खालवी । सर्दार त्यातें बहु दूर घालवी ७४
जो फार मोठा धनराशि लाभला । लोभें तयाच्या मतिला दिला भला ॥
टोला चळे कीं कळवी न आक्बरा । तें खान तो[6] पातक[7] मानवा खरा ७५
नृपाल[8]-शार्दूल उदंत[9] आयके । हा कीं धनाचा निज सैन्य-नायकें ॥
विश्वस्त केला अपहार धीर-धी । जाई तिथें सावध दुष्ट वारि[10] धी[11] ७६

वंशस्थ.

असत्य मार्गीं धनलोभ ठेववी । पहा नराचें पद पाप[12] - ठेव वी[13] ॥
कुठार विश्वास[14] - नगास हा खर[15] । अकीर्तिचाही झर[16] कीं अनावर ७७

उपजाति.

मला खरा आधमखान वाटे । ऱ्हस्वादि[17] लागे तरि[18] या कुवाटे ॥
राजेंद्र बोले तुज लाज सोडी । जी सज्जनांची नव शालजोडी ॥ ७८

---

१ केलेल्या कर्माविषयीं पश्चात्तापानें. २ आक्बराचा एक सरदार, आधमखान. ३ माळवा प्रांत. ४ अकबर. ५ माळव्याचा राजा. ६ लोभ. ७ पाडणारा. ८ राजश्रेष्ठ. ९ वार्ता. १० निवारिता झाला. ११ बुद्धि. १२ पापाची ठेव. १३ उत्पन्न करितो. १४ विश्वासरूप झाडास. १५ तीक्ष्ण. १६ झरा. १७ ऱ्हस्व आहे आद्यक्षर ज्याचें असा आधमखान हा शब्द—अधमखान. १८ म्हणून.

मोठा तुला मी अधिकार अर्पी । जो संपदा देउनि नित्य तर्पी ॥
सरोवरा सुंदर काक टाकी । पी खापरींचें जल तूं असा कीं ॥ ७९
लावण्य - खाणी रमणीय रामा[१] । सती[२] तरी ये कुनरा[३] न कामा ॥
कदा रुचेना कुलटेपरी[४] ती । त्वां सेविली आज तशीच रीती ॥ ८०
हा बोल बोले नरसिंह कोपें । क्षणांत शोभे हि तदीय[५] लोपें[६] ॥
जाणा महात्मे क्षण-कोप[७] सारे । न पद्म-पत्रीं जल-बिंदु थारे[८] ॥ ८१

इंद्रवज्रा.

आग्र्यास येतो अकलंक[९] चंद्र । प्रेमें प्रजा - वत्सल भूपतींद्र ॥
सानंद त्यातें जन सर्व पाहे । जाणों तया नित्य नवीन आहे ॥ ८२

इंद्रवंशा.

एके दिनीं तो नरवीर - भूषण । आकारुनीया सरदार भाषण ॥
गंभीर अर्थें परिपूर्णसें करी । पीयूष ज्याची न करूं टिके सरी ॥ ८३

## सरदारांस बोध.

भुजंगप्रयात.

घराला घुशी लागुनी पोखरीती ।
अरी मोगलां पीडिती याच रीती ॥
रणीं पंजरीं[१०] त्यांस कोंडोनि झोडा ।
यशाची खरी निस्तुला ठेव जोडा ॥ ८४

---

१ स्त्री. २ पतिव्रता. ३ अधम पुरुषास. ४ जारिणीप्रमाणें. ५ त्या कोपाच्या. ६ नाशानें, अभावानें. ७ क्षणभर टिकणारा आहे कोप ज्यांचा असे. ८ स्थिर राहतें. ९ निष्कलंक. १० पिंजऱ्यांत.

जसें आत्महस्तें श्रमें अन्न पोटीं ।
भरोनी सुखें घ्यावि साधोनि पुष्टि ।।
तसें वंशजा आजि या बाबराच्या ।
यशानें भरा घ्या लुटी मोहरांच्या ॥ ८५
प्रभावाख्य[१] सूर्यें सपत्नांधकारा[२] ।
क्षणें नासुनी लोक - पीडा निवारा ॥
स्थिरा राज्य - लक्ष्मी जना सौख्यकारी ।
प्रभावा वरी काळजीला निवारी ॥ ८६
स्वमातेप्रती वीरसू[३] नाम शोभे ।
असें दाखवा कीर्तिच्या स्तुत्य लोभें ॥
तृणाचे परी तुच्छ निर्माल्य जन्मे ।
नर प्राज्ञ हें बोलती शुद्ध - जन्मे ॥ ८७
तुह्मा वैनतेया[४] द्विषत्पन्नगांहीं[५] ।
तुह्मावज्ररूपा द्विषत्सन्नगांहीं[६] ॥
पहातां तृणा तूर्ण[७] दांतीं धरावें ।
अशा वीर - मार्गासि हो आचरावें ॥ ८८
उगे मत्सरें आपसाआपसांत ।
भ्रमें भांडुनी रोकडा दों दिसांत ॥
शिरीं नाश कां व्यर्थ ओढोनि घ्यावा ।
अरीचा यशें काय ओटा भरावा ॥ ८९

---

१ पराक्रमरूप सूर्यानें. २ शत्रुरूप अंधकारास. ३ वीरास प्रसवणारी. ४ गरुडास. ५ शत्रुरूप सर्पांनीं. ६ शत्रुरूप मोठ्या पर्वतांनीं. ७ लवकर.

पहा घांसती जीर्ण शाखा वनांत ।
जईं एकमेकावरी तें क्षणांत ॥
समुद्भूत तद्धर्षणें चंड दाव ।
तया जाळितो हा कलीचा प्रभाव ॥ ९०
बरें आपलें त्यापरी दूसऱ्याचें ।
जयें होय तें कृत्य जाणा भल्याचें ॥
धरोनी मनीं श्लाघ्य देशाभिमान ।
तया रक्षितां होतसे थोर मान ॥ ९१
सपत्नांसि जिंकूं प्रजा-वत्स पाळूं ।
धरा कामदा तुष्ट धेनू मवाळू ॥
असा प्रौढ तो भूपती बोल बोले ।
तया ऐकतां अंतरीं तुष्ट झाले ॥ ९२
तदा वीर ते थोपटोनी स्व-बाहू ।
नृपा बोलती काय आज्ञा करा हूं ॥
महाराज तो कोणता शत्रु दावा ।
अशा गादिचा जो धरी चित्तिं दावा ॥ ९३
धरा[1]त्रास कोणि नकोसाचि वाटे ।
यमाच्या तया दाखवूं इष्ट वाटे ॥
रणीं होति ·[2]घायें करूं छिन्न त्यातें ।
करूनी पुढें नम्र आणूं स्वहस्तें ॥ ९४

---

१ पृथ्वीवर राहणें. २ तलवारीच्या घावानें.

असें शब्द-पीयूष तो तुष्ट चित्तें ।
पिई कर्ण-युग्में[1] धरोप[2] स्व-हस्तें ॥
ह्मणे वाढवा शत्रु जिंका जुना जो ।
चितोडाधिप प्राप्त-दुष्कीर्ति लाजो ॥ ९५
असा राज चूडामणी बोल बोले ।
तयानें रणा वीर ते सिद्ध झाले ॥
नरां वीर खाऊ मुलां तेंचि[3] वाटे ।
रणोत्साह ऐसा मनीं फार दाटे ॥ ९६

## चितोडावर स्वारी.

### इंद्रवंशा.

होता चितोडाधिपती बलाग्रणी ।
नामें उदेसिंग मृगेंद्रसा रणीं ॥
दिल्लीपतीतें वश तो न जाहला ।
कीं पारतंत्र्या न खुषी हलाहला[4] ॥ ९७
त्या पारतंत्र्यात्मक दुःख-वारिधी ।
मोठा असे दुस्तर मान्य योग्य धी ॥
स्वातंत्र्यपीयूषच सौख्य-कारक ।
होतो कसा तो रजपूत-नायक ॥ ९८
स्वातंत्र्य ऐसें निज दिव्य मौक्तिकें[5] ।
शोभास्पद प्राज्य खरें अमोलिक ॥

---

१ कानांच्या जोडीनें–दोन कानांनीं. २ राजा. ३ रण. ४ विषास. ५ मोतीं.

टाकूनि शुक्ती परतंत्रता कशी ।
स्वीकारणें हा सुविचार मानसीं ॥ ९९
स्वातंत्र्य-लाभें मनिं भाकरी बरी ।
आहे मला हे परमान्न[1] जो खरी ।
मानी समुच्छिष्ट कसां[2] न तो गणी ॥
कांजी सुधेला[3] परतंत्र होउनी ॥ २००
भूपाल कोपे अपमान दुःसह ।
वाटे तयाला अपल्या बलासह[4] ॥
स्वारी करायास्तव शीघ्र तो निघे ।
सोत्साह शत्रूवरि हस्ति हेति घे ॥ १
निःसीम सैन्यार्णव[5] काय लोटला ।
देशावरी शात्रव[6] मग्न जाहला ॥
वेगें करायास्तव सिद्ध आपण ।
दुर्भाग्य वा मूर्त[7] करूनिया पण ॥ २
संग्राम-भेरी घनघोर वाजती ।
गंभीर त्यांचे गगनांत कोंदती ॥
नाद प्रमोदें जयलक्ष्मि नोवरी ।
अस्मन्नृपाला ह्मणती जणो वरी ॥ ३
निशाण अत्युन्नत तें विराजलें ।
यद्वस्त्र वातेरित[8] फार कांपलें ॥

---

१ खीर. २ पेंज. ३ अमृताला. ४ सैन्यासह. ५ ( सैन्य + अर्णव ) सैन्यरूप समुद्र. ६ शत्रुसंबंधी. ७ मूर्तिमंत. ८ ( वात + ईरित ) वायूनें कांपिवलेलें.

तें सूचनेला करि कीं नृपापुढें ।
कांपेल भेणें[1] अरि-सैन्य बापुडें ॥ ४
अत्युच्छ्रित[2] प्राज्ञ नृपाळ धीर-धी ।
हा सद्‌गुणांचा बहु थोर वारिधी ॥
फेकील कीं कीर्ति[3]तरंग अंबरीं ।
देईल आ ंद जनास अंतरीं ॥ ५
वाटे करी[4] जंगमें[5] टेकड्या जशा ।
ह्या हालती कीं घन-पंक्ति कृष्णशा[6] ॥
वातेरित प्रोन्नत वीर-हस्तग ।
शस्त्रास्त्र-कांती चपला[7] दिसे मग ॥ ६
गजाश्व-पृष्ठावरि वीर-संघते ।
शरीर वज्रापरि घट्ट शोभतें ॥
ज्यांचें, स्व-कार्य-क्षम-देह-धारण ।
केलें गमे वीर-रसें स-कारण ॥ ७
घोड्यावरी स्वार लगाम खेंचित ।
रांगेमधे चालति ते रणोचित[8] ॥
ज्यांच्या करीं खड्ग सुतीक्ष्ण शोभती ।
कीं मृत्यु-जिव्हाच भयाण भासती ॥ ८
ते होउनी तन्मय वीर चालती ।
ज्यांच्या मनीं युद्ध-विचार घोळती ॥

---

१ भयानें. २ ( अति + उच्छ्रित ) उन्नतावस्थेस पोंचलेला. ३ कीर्तीच्या लाटा. ४ हत्ती. ५ हलणाऱ्या. ६ काळ्या अशा. ७ वीज. ८ युद्धास योग्य.

हातांतले शत्रु उभा विकलपुन ।
भाले पुढें टोंचिति मोघ[1] आपण ॥ ९
स-खड्ग कोणी तलवार वाकडी ।
हवेंत वेगें फिरवीहि फांकडी ॥
भावी मनीं कीं अरि-शीर्ष तोडिलें ।
युद्धांत ऐसें यश भव्य जोडिलें ॥ १०
मार्गांत रेताड शरीर झांकलें ।
त्यांचें धुळीनें नयनास भासलें ॥
आलिंगिलेलें निजशत्रु-भूमिनें ।
कोणास मानी तयिं धन्य तो जिणें ॥ ११
कोणी ह्मणे मी रणे-मल्ल[2] धीर-धी ।
व्यापीन वेगें अरि-सैन्य-वारिधी ॥
एक स्वयें वह्नि अनेक वाळलीं ।
खंडें तृणाचीं करि दग्ध सांचलीं[3] ॥ १२
मारीन किंवा वशमीहि मृत्युला ।
होईन कोणी न पळेल हा भला ॥
माता मदीया गणिजेल वीरसू ।
तो आवडे पंथ ह्मणे नहे असू[4] ॥ १३
जाणे असे सोडुनि एकदा धरा ।
वाहीन युद्धीं तिस पुष्प कंधरा[5] ॥

---

१ व्यर्थ. २ रणांत झुंजणारा. ३ सांचलेलीं. ४ प्राण. ५ मान.

स्वर्गास जोडीन मनुष्य - भूषण ।
होईन कोणी करि हें सु - भाषण ॥ १४
संग्राम - रंगीं निज - शत्रु - मंडळ ।
भेदीन वेगें शरसाच सोज्ज्वळ ॥
येईन मागें पद मी न एकही ।
कोणी वदे होय स-वीर हे मही ॥ १५
संग्राम - भूमी वन दिव्य नंदन[1] ।
आह्मा द्विषच्छोणित[2] हेंचि चंदन ॥
शस्त्रास्त्र - संप्रेरण सद्विलास हा ।
देवां जय - श्री वर अप्सरा पहा ॥ १६
उत्साहवंत प्रतिभीम वाटती ।
चालींत[3] त्यांते कळली न वाट ती ॥
तच्चित्तवृत्ति भ्रमरी च गुंगली ।
होती विचारात्मक - पंकजीं भली ॥ १७
जैशी नृपाळास गजांत[4] सुंदर ।
गेहांत लक्ष्मी पथि ते बरोबर ॥
साध्वी पतीच्या समवेत चालली ।
लोकांस वाटे हृदयांत चांगली ॥ १८
हिमालयाचे परि भूप शोभला ।
महा - गजारूढ सतेज जो भला ॥

---

१ इंद्राच्या बागेचें नांव. २ ( द्विषत् + शोणित ) शत्रूचें रक्त. ३ चालण्यांत. ४ गजांत लक्ष्मी असा अन्वय.

सर्दार होते गज-पृष्ठ-संस्थित ।
पृथ्वींतले शैल दुजे[1] विराजित ॥ १९
वाटेंत मुक्कामिं पुरी स्व वाटली ।
त्याच्या सवें शोभन[2] काय पातली ॥
रूपांतरीं[3] सद्गृह-पंक्ति घेउनी ।
ती[4] वस्त्र वेश्मान्वित[5] सक्त सेवनीं ॥ २०
तें आकबराधिष्ठित सैन्य थोरसें ।
मार्गांत ये आत्मपुरावरी असें ॥
आकार्णितां वीर तयार जाहले ।
ते क्षात्र धर्मापरि मूर्त भासले ॥ २१
राणा उदेसिंग चुके तदग्रणी ।
स्त्री एक आत्म-प्रिय तो करी रणीं ॥
घेऊन कांहीं जन जाय पर्वतीं ।
हा सिंह नोहे शश[6] सत्य भाविती ॥ २२
योग्य प्रसंगास चुकी स्व-हानि ही ।
आहे महा घोर ह्मणे असें मही ॥
मानून त्यातें तृण-तुच्छ भूपती ।
चितोडचा जाय नशीब! पर्वतीं ॥ २३
त्या न स्मरे कीं रविचिन्ह[7]-भूषित ।
आहे ध्वज प्राक्तन[8] कीर्ति-दूषित[9] ॥

---

१ दुसरे. २ सुंदर. ३ निराळ्या रूपांत. ४ पुरी. ५ कापडाच्या घरांनीं युक्त. ६ ससा. ७ सूर्याच्या चिन्हानें शोभिवंत. ८ जुना. ९ कीर्तीच्या संबंधांत दूषित.

होऊं न देती धृत-धैर्य मानसीं ।
त्यांतें[1] कुलीन प्रभु मित्र ज्यां आसि ॥ २४
बाप्पा* तसा सामरसी* हि रावळ* ।
सम्राट पुढें लक्ष्मण* सिंह निर्मळ ।
योद्धा हमीराभिध* आणि खेतसी* ॥
राणाहि कुंभो* मग संग* साहसी ॥ २५
झुंजार धिप्पाड हि देशसेवक ।
ते जें बळें मानव-सिंह-नायक ॥
भाला भला वाह जणों कट्यारही ।
बाहेरचे प्राण यदीय सत्य हीं ॥ २६
शोभे जयाच्या परिपूर्ण अंबरीं ।
उत्साह रात्रि-दिव सूर्य अंतरीं ॥
आश्चर्य ! देईल कशी अशां पिडा ।
भीत्यंधकार प्रधनांत[2] बापडा ॥ २७
वंशांत त्यांच्या रण-भीति-राक्षसी ।
खाई जिला ते नृप-मूर्ति[3] कायसी ॥
जन्मास ये कांच हिऱ्यांत सुंदर ।
पंचास्य-वंशीं[4] हरिणी असुंदर ॥ २८
पन्ना[5] विपन्न-स्थितिमाजि निर्भय ।
पन्ना† खरी दाइ दयालु निर्दय ॥

---

१ त्या ध्वजास. * इत्यादि खुणा केलेलीं उदेपुरच्या घराण्यांतील प्रख्यात राजांचीं नांवें आहेत. २ युद्धांत. ३ उदेसिंगाची मूर्ति. ४ सिंहाच्या वंशांत. ५ ह्या बाईची गोष्ट मराठी चवथ्या पुस्तकांत आहे ती पहावी. † हिरा—हिरकणी.

स्व - स्वामि - भक्तीस्तव भुप - नंदन ।
रक्षी, बळी दे तनय स्व आपण ॥ २९
बाया अशा धीर जयांत जन्मती ।
ते धन्य मोठे रजपूत मन्मती ॥

जाणा खरीं हीं निज - देश - भूषणें ।
संतोष त्यांच्या वरि चित्त गायनें ॥ ३०
गेला उदेसिंग पुर स्व सोडुनी ।
बाळ प्रमोदें रमणी तया उनीं ॥
छाया कराया वर यत्न ती करी ।
ही धन्य भासे करिणी न तो करी ॥ ३१

स्त्रीचें प्रधानत्व गचाळ भूपति ।
हा योग येतां मग विघ्न - संतति ॥
हें वादळ प्राज्य उठोनि मज्जवी ।
तद्राज्य - नौकेस विपन्महार्णवी ॥ ३२
शोभा सुकीर्ती रमणी खरोखर ।
सोडून गेल्या विधवा असुंदर ॥
राष्ट्रास ह्या बोलति लोक संस्तुत ।
घाली गळां माळ अलक्ष्मि सांप्रत ॥ ३३
स्त्रीनायकत्वें अयशोब्धि[1] - मज्जन ।
युद्धांत होईलच वीर सज्जन ॥

---

१ दुष्कीर्तीच्या समुद्रांत बुडणें.

सैन्यांतले खिन्न अपार मानसीं ।<br>
वाणी मुखें काढिति ते तदा असी ॥ ३४<br>
त्यांनीं पुढें तैं रणभूमिला बळी ।<br>
कापून तच्छीर्ष[1] दिला न आकळी ॥<br>
त्यांचे मना शांति सतेज सोशिती ।<br>
मानी न केव्हां अपमान सन्मति ॥ ३५<br>
राजा जरी भीति धरी मनीं पळे ।<br>
सर्दार गंभीर बलाढ्य जाहले ॥<br>
सिद्ध प्रमोदें लढण्या न नांव[2] ते ।<br>
जावोत जाती असु[3] जाउ बोलते[4] ॥ ३६<br>
दोन्ही दळें क्षुब्ध जसें महार्णव ।<br>
एकावरी लोटति एक ते जव ॥<br>
मोठा धरूनी रण घोर माजलें ।<br>
तें अंतकाचें दरबार साजलें ॥ ३७<br>
कोठें कुठें मेदिनि[5] सागरीं शिरे ।<br>
कोठें तसा सागर आंत संचरे[6] ॥<br>
भूमीवरी तेवि फळया द्विसैन्यँग[7] ।<br>
मागें पुढें होति रणांत त्या मग ॥ ३८<br>
लाटेवरी लाट समुद्रिं आदळे ।<br>
तैशीं फळी एक दुजी वरी बळे ॥

---

१ ( तत् + शीर्ष ) त्या उद्देसिंगाच्या राखेचें मस्तक. २ कीर्ति. ३ प्राण. ४ बोलते जाहले अशी योजना. ५ जमीन. ६ शिरतो. ७ दोन सैन्यांतील.

निर्वीर्य अन्योन्य करूनि संक्षय ।
होती जना शांत वरी महा-भय ॥ ३९
विच्छिन्न खड्गें अति तीक्ष्ण वर्तुळ ।
शीर्षें पुढें ठेवियले च नारळ ॥
संतुष्ट व्हाया रणभूमि-दैवत ।
होते जणो शोणित-कुंकुमान्वित ॥ ४०

उपजाति.

रणीं व्यवस्थेंतहि अव्यवस्था । जेथें तिथें हीच दिसे अवस्था ॥
वीर-क्षयें वाह[१] करी[२] रिकामे । वि-हस्त[३] ही योध फिरे स्व-कामें[४] ॥ ४१
चितोड-वीरीं रण-धैर्य दाटे । रणोत्सव प्राज्य मनांत थाटे ॥
न भीतिलेशासहि त्यांत जागा । तच्चित्त सांगे स्वजयार्थ जागा ॥ ४२
चौंडा[५] महाशूर-शिरोवतंस । रणाग्रभागीं रणदेवतेस ॥
करी स्वदेहार्पण उत्सवानें । ही सत्कृती लोक अ-कुत्स[६] वानें[७] ॥ ४३
पत्ता[८] लढे नायक केळव्याचा । नवा वयें षोडश हायनांचा[९] ॥
युद्धाग्र-यायी रणरंग-धीर । पंचाननाचा जणु तो किशोर[१०] ॥ ४४
तो हो उदासीन न तात-घातें । म्हणून त्याची जननी स्वहातें ॥
धरूनि सावेश मनीं कृपाण । सोत्साह त्यातें करि सावधान ॥ ४५
हें काय त्याची ललना लढेही । होती स्त्रिया वीर-रसें वि-देही[११] ॥
नरां तरी धैर्य भरे अपार । पराक्रमाची खनि दुर्निवार ॥ ४६

---

१ घोडे. २ हत्ती. ३ हात तुटलेला. ४ स्वेच्छेनें. ५ एक रजपूत वीर. ६ अनिंद्य. ७ वर्णितो. ८ हें एका शूर रजपुताचें नांव आहे. ९ वर्षांचा. १० मुलगा. ११ ज्यांस देहभान नाहीं अशा.

यशोनगाच्या अति उंच-शृंगीं । आरूढ नारी-नर-पक्षि भृंगी ॥
तल्लीन पंक्ती न कवीश्वरांच्या । होती कशा मार्मिक थोर साच्या ४७
तृणाग्रिंचा हें जलबिंदु आयु । प्राण[1] त्यजी भंगुर देह-वायु ॥
चिंतून हें जो स्वतनूस टाकी । यशः शरीरें उरतोच बाकी ॥ ४८
तसाच यच्छौर्यमणी अमोल । निर्भीक सर्दार हि यंत्र-गोल ॥
लागूनिया तो जयमल्ल होय । यमालयाचा अतिथी शिवाय ॥ ४९
बाकी पुढें अष्ट सहस्र वीर । धावून गेले रण-दक्ष धीर ॥
संशप्तक[2] प्राप्त रणांत काय । ते होमिती शेवटचा उपाय ॥ ५०
आंगें लढे आक्बर युद्ध-रंगीं । सावेशही तद्भट[3] ह्या प्रसंगीं ॥
वरीति त्यातें जयलक्ष्मि-कीर्ति । झाली सुदैवेंच तदिष्ट-पूर्ति ॥ ५१
किल्ला करीं ये निज तैं अजिंक्य । चितोडचा बादशहा अशक्य ॥
ह्मणे घडे शक्य पराक्रमानें । सत्कारि सानंद भटांस मानें ॥ ५२
पुरीं शिरे सैन्य करी धुमाळी । दया नृपाची अटली अकाळीं ॥
तैमूरलंगासम कृत्य केलें । मुखा अपेशें निज कुट्ट काळें ॥ ५३
गळे स्त्रियांचे चिरिले चरारा । शिरें शिशूंची हि धनौघ सारा ॥
लोभें नृपानें लुटिला कलंक । कीं लाविला शुभ्र यशास पंक ॥ ५४
मनोज्ञ देवायतनें हि पाडी । आग्र्यास वस्तू बहुमोल धाडी ॥
विवेक सन्मित्र पळे दिगंतीं । तो अंध वाटे मद-मत्त दंती ॥ ५५
सामर्थ्य मोठें अविचार भारी । तारुण्यही चित्त-विकार-कारी ॥
न कोणिही बोधक सन्निधानीं[4] । हा योग येतां जगिं होय हानी ॥ ५६

---

१ प्राण हा वायु ( भंगुर देह त्यजी असा अन्वय. ) २ मारूं किंवा मरूं अशा निश्चयानें लढणारे वीर. ३ त्याचे योद्धे. ४ जवळ.

इंद्रवंशा.

सत्कीर्तिचा मंडप थोर अकबर। घाली स्वयें उत्सुक जो मनोहर ॥
त्यातें कुदृष्टी न करो पिडा कधीं। संपादि हा खेटर जीर्ण कीं अधी ५७

उपजाति.

जसा महासागर शांत राहे। तारी जना सौख्यद सौम्य वाहे ॥
तुफानिं तो क्षुब्ध करी निमग्न। सर्वांस आशा करूनी वि-भग्न ॥ ५८
तैसा गमे एथ नृपाळ सौम्य। चंद्राहुनी शितळ नित्य रम्य ॥
संतप्त होऊनि अकार्यकारी। क्षणैक झाला कु-मनोविकारीं ॥ ५९
आनंदभेरी बडवीत आला। पुरा स्व तद्दर्शनिं तो निवाला ॥
उंचबळे हर्ष-समुद्र तेव्हां। तो पावला हो नृपचंद्र जेव्हां ॥ ६०
चीस्ती सिजिस्तानि फकीर ज्याचा। पवित्र दर्गा[1] नृप आज्मिरींचा।
गेला तिथें प्रेमळ भक्त पायीं। विश्वास हा तारक हो अपायीं ॥ ६१

## राज्यवृद्धि.

पृथ्वी.

क्रमें करुनि वाढलें नृपति-राज्य *सौख्यागर।
उपाय तयिं योजक प्रथम तो दया-सागर ॥
अखंड करि अकबर प्रभु-शिरोमणी† तीन ते।
परि प्रधन शेवटीं जरि नये अरी नम्रते ॥ ६२
प्रवाह नदिचा जसा उगमिं आसतो सान तो।
समुद्रग पुढें पुढें नवनद्यांमुळें वाढतो ॥

१ मुसलमानी साधूंचा मठ, त्यांत पीर असतो. * सौख्याचा बाग.
† राजांचा मुकुटमणी.

तसाच अधिकार हा सतत मोंगलाचा वरी ।
स्ववृद्धि परमा नवे विषय लाभतां लौकरी ॥ ६३
अर्धीं अर्धि नृपाग्रणी शमवि शत्रु एकीकडे ।
दुज्या उठति ते क्षणें त्वरित थोर तैं वाकडे ॥
भयंकर महाबली अतुल पक्षघातापरी[1] । ॥
समूळ निवटी स्वकींच विषय[2]-देहिं धन्वंतरी[3] ॥ ६४
कधीं रतनभोर घे नृपति वीर-सिंहाग्रणी ।
कधीं स-चमु जाउनी रुचिर गुर्जरातें* रणीं ॥
प्रतापरवि खालवी स्वरिपु तारका-संघ हा ।
तरी सुखवि चंद्रिका-धवल-कीर्ति लोकां पहा ॥ ६५
पराभवुनि दाउद[4] प्रति-रवीच[5] तो काजवा ।
धनाढ्य निज मेळवी विषय गौड† मोठा नवा ॥
बहारहि पुढें करी स्व-वश भूप झुंजार हा ।
सुखें निज भटां ह्मणे विजय-युद्धिं झुंजा रहा ॥ ६६
महा-कलह माजला नृपकुलांत काश्मीरिं हीं ।
जयीं श्रुति-पथांत ये चतुर-नाथ[6] वार्ता जिहीं ॥
अनेक-समयीं रणीं विजय मित्र केला स्तुत ।
तयां विषय घ्यावया स-बळ पाठवी प्रस्तुत ॥ ६७
मृगेंद्र शिरतां वनाप्रति करी क्षणें आपलें ॥
तसें नृपतिच्या जनीं बहु पराक्रमी त्या भले ॥

---

१ ह्या नांवाच्या रोगाप्रमाणें. २ देशरूप देहांत. ३ केवळ धन्वंतरीच असा आक्बर. * गुजराथ देशास. ४ दाउदखान नांवाचा बंगालचा प्रतिपक्षी सरदार. ५ प्रतिसूर्य. † बंगाला. ६ चतुरांचा नायक.

स्वहस्तगत राष्ट्र तें करुन नंदनोद्यानसें[1] ॥
दिलें नृप-पुरंदरा[2] सतत तुष्ट जो मानसें ॥ ६८
पुढें कितिक घ्यावया दिवस भूप विश्रांतिला ॥
निघोनि विषयीं तया परम रम्य गेला भला ॥
प्रयत्न अधि चांगला सफल कार्य-कारी मग ॥
करी उचित संतत त्रिदिवें[3] हें विसावा जग ॥ ६९
सवें चतुर साहसी परम आप्त लोकांस घे ॥
मुखांतुन सुधारसासम यदीय वाणी निघे ॥
तसें हृदय हें सरोवर सुपूर्ण मोदें जलें ॥
हुशार मृगयेंत जे चपल धीट नांवाजले ॥ ७०

## मृगया.

### गीति.

मृगयोचित वेषानें युक्त हयारूढ[4] नरवरेश जवें ॥
परिवार उचित परिमित स-शस्त्र घेउनि निघे स-तोष सवें ॥ ७१
टाकुनि घोडे मागें धांवति वेगें तया पुढें कुतरे ॥
यद्भाषित-श्रवणोत्तर[5] वन्य-पशु-स्वबल-गर्व झट उतरे ॥ ७२
धांवत असतां त्यांच्या हालति जिव्हा मुखांत आरक्त ॥
गमले उत्सुक चाटूं हत-सत्वाचें[6] करून आ-रक्त ॥ ७३

---

१ ( नंदन + उद्यान ) नंदन वनासारखें. २ राजेंद्रास. ३ स्वर्गें. ४ ( हय + आरूढ ) घोड्यावर बसलेला. ५ ज्याचें भुंकणें ऐकिल्यानंतर. ६ मारलेल्या प्राण्यांचें.

हुंगिति वन-भूमिस ते जेथें तेथें तसेंच गंधवहा[1] ॥
भक्ष्यार्थ, स्वानुग[2] कीं पावो पशु वध्य शीघ्र पार्थिव हा ॥ ७४
धांवति वेळोवेळीं पार्श्व-स्थित मार्गि सान ते पक्षी ॥
उत्कंठित तद्ग्रहणीं परि फसतां त्यां[3] स-हास[4] जन लक्षी ॥ ७५
पळतां श्रमें तृषित ते प्राशिति जल निर्झरीं[5] पडाति मागें ॥
धावुनि वाऱ्यापरि ते पुढें पुन्हा चालती चपळ मार्गें ॥ ७६
नसते परमेशानें केलें उत्पन्न विश्वकु[6] जरी ॥
मृगयेंत विजय मुकते तत्साधक आसते हुशार तरी ॥ ७७
परमेश-भक्त कैसे तत्पर व्हावें सदा मनुष्यांनीं ।
हें निज तद्भक्तीनें शिकाविति कुतरे शिको सुनर मानी ॥ ७८
देवाच्या सृष्टिमधें कोठें कांहीं तरी कमी राहे ॥
यास उदाहरण पहा श्वानातें स्पष्ट वाक दिलि न आहे ॥ ७९
पळती शोधिति पशुंचीं वसतिस्थानें तयास हुसकीती ॥
सहसा कधिं लक्ष्यायू दोघांचे बाण वांटुनी घेती ॥ ८०
जखमी धावूनिहि कधिं लपतां सत्वें दुज्या स्थळीं थांग ॥
तच्छोणित-बिंदु-पथें कुणि लावुनि करि शरें विभिन्नांग ॥ ८१
एकसरें व्याघ्र पडे दशबाणांहीं विभिन्न तें कलह ॥
दशपुरुषांचा लागे बोले प्रत्येक विजयि मी स-मह[7] ॥ ८२
शारीर बलाहुनि बहु बुद्धीचें श्रेष्ठ हो खरेंच बळ ॥
दूरुनि मारुनि मार्गण केलें व्यसु नृपतिनें हरि[8] प्र-पळ ॥ ८३

---

१ वाऱ्यास. २ ( स्व + अनुग ) आपल्या मागून येणारा. ३ कुत्र्यांस.
४ मोठ्यानें हांसत. ५ झऱ्यावर. ६ शिकारी कुत्रे. ७ सहर्ष. ८ सिंह.

गहनाटवींत[1] मोठा व्याघ्राला बाण लागुनी तिखट ॥
आ पसरी वीर तया करिती नव - रोपे[2] - पूर्ण मुख विकट[3] ॥ ८४
वृक - सेना वधुनि नृपें स - दयें दुर्बळ पशू सुखी केले ॥
खल - दीन - संघ[4] शासन - रक्षण नृप - कर्म तत्व जाणविलें ॥ ८५
कोलाहल परिसुनि बहु वनें[5] - सूकर पल्वलें[6] त्यजुनि उठले ॥
भय - कंपित तनु[7] झाडुनि सवेग धावत समोर ते सुटले ॥ ८६
नाद - दिशा रोंखुनि[8] ते माराया शत्रुला निज मुसांडी ॥
धावति वराह त्यांची शरभिन्न प्राण शीघ्र चर्मु सांडी ॥ ८७
स्वार शिकारी कोणी चकवुनि जातां शिकार त्यां खिन्न ॥
अति तत्पर शोधिति तिस भाले टोंचुनि करावया भिन्न ॥ ८८
एका पासुनि सुटली शिकार साधी दुजा सवेग शेरें[9] ॥
हांसुनि ह्मणे मनिं तया न सु - दैव इथें तुला मला वश रे ॥ ८९
वारंवार वधाया - वन - पशु सुटती अनेक - विध बार ॥
बंदुकिचे गोलक - युत भरला भासे कृतांत[10] - दरबार ॥ ९०
अश्रुत - पूर्व रवें त्या झाला वनिं मनिं सशंक पंचास्य[11] ॥
गर्जे गंभीर वैरी[12] मेघासम मोर पाहि करि लास्य[13] ॥ ९१
ज्याला त्याला अति घन[14] - गर्भीं जवळ मानसीं वाटे ॥
सिंह[15] - स्थिति बहु - भीषण[16] नाद असा वनिं न अंबरींहि[17] दाटे ॥ ९२

---

१ ( गहन + अटवी ) निबिड अरण्यांत. २ नवीन बाणांनीं भरलें आहे तोंड ज्याचें असा. ३ भयंकर. ४ दुष्ट आणि दीन ह्यांच्या समुदायांचें अनुक्रमें शासन आणि संरक्षण. ५ रानडुक्र. ६ पाण्याचीं डबकीं. ७ शरीर. ८ टोळी. ९ बाणानें. १० मृत्यूचा दरबार. ११ सिंह. १२ वर १३ नृत्य. —मेघनाद होऊं लागला म्हणजे मोर आनंदानें नाचतात. १४ फार दाट अरण्याच्या मध्यभागीं. १५ सिंह असणें. १६ भयंकर. १७ आकाशांत.

मृत्यु भयंकर हिंडे सिंह न तो मूर्त पसरुनी दाढा ॥
त्या भासती तयाच्या वज्रासम होति-तत्रितर गाढा[1] ॥ ८६
होतां दृश्य[2] तयाच्या बंदुकिचा गोलक प्र-जव[3] कर्णीं ॥
प्रथम शिरे त्यास जणों सांगे मत्सख[4] अनेक आकर्णीं ॥ ८७
आहेत भ्रत्यांपरि त्वत्प्राण-धनास वाटुनां घेती ॥
ते आतां सावध हो होउनि मदनुग सवेग बघ येती ॥ ८८
इतक्यांत ते तदंगीं शिरिती करिती पळामध्यें अंत ॥
श्रम-साध्य-कृत्य-विजयें वीर मनीं पावती महा आनंत ॥ ८९

## वनवर्णन.

### शार्दूलविक्रीडित.

उत्साहें मृगया करूनि नृपती विश्रांतिला काननीं[5] ।
घ्याया वांछि मनोज्ञ विस्तृत असे जो कां दमूनी मनीं ॥
तों दृष्टीस पडे सरोवर जळें संपूर्ण जें वेष्टिलें ।
वृक्षीं उंच विलास[6]-दर्पण वन[7]-श्रीचा महा भासलें ॥ ९० ॥
सौंदर्यांत अपार दृष्टि जडतां हेलावला[8] सागर । .
हर्षाचा हृदयीं तदा नृपतिच्या तो हो क्षणें विज्वर[9] ॥
वायूनें उठती तरंग सरिं त्या उत्तुंग[10] वेगें जसे ।
तैसे अद्भुत कल्पनामय धरी राजेंद्र सन्मानसें ॥ ९१

---

१ बळकट. २ हें विशेषण ‘ सिंह ’ या अध्याहृतपदाचें. ३ वेगवान. ४ माझे मित्र. ५ वनांत. ६ विलासाचा आरसा. ७ वनश्री हीच कोणी एक विलासिनी स्त्री तिचा. ८ उचंबळला. ९ तापरहित. १० फार उंच.

जेथें जाइल भूमिपृष्ठिं म्हणती कीं भाग्यशाली नर ।
तेथें श्रीहरिच्या कृपें करुनियां तत्सेवनीं सादर ॥
होती गोष्टि निजानुकूल सगळया रानीं म्हणा कीं घरीं ।
राजा येइ सरस्तटीं विधिवशें तो सूर्यसा अंबरीं ॥ ९२
पद्मांनीं भरलें सुगंध पसरी तें तूर्ण चोहींकडे ।
साह्या पावुनि वायुदत्त सुख तो देई जनां रोकडें ॥
लोकातें सुचवी परांस सुख द्या तेणें वरा धन्यता ।
जाणा सार जगीं परोपकृति[1] हें ते दे खरी मान्यता ॥ ९३
राजा पूज्य समीप येइ ह्मणुनी जाणों सरें धाडिला ।
त्याचें स्वागत व्हावयास निज-संसर्गें[2] बहु चांगला ।
वायू शीतल मंद कार्य निज तो उत्कृष्ट रीत्या करी ॥
कीं धर्म-स्तुत[3] चांगली अतिथिची आहे जगीं चाकरी ॥ ९४
वाटे आसन घातलें नृपवरा विस्तीर्ण काठीं शिला ।
होत्या निर्मळ भव्य ज्यांवरि तरु-च्छाया असे शीतला ॥
तेथें कोकिळ भृंग गायक जणों गाती रवें सु-स्वर ।
आनंदान्वित पोंहला स-गण[4] तो सत्सेव्य राजेश्वर ॥ ९५
मध्यान्हीं रविच्या प्रभे सर दिसे तें रौप्य पत्रा नवा ।
पारा पातळ शुभ्रवर्ण अथवा येना मनीं वानवा[5] ।
नेत्रांनीं तयिं पाहतांचि गमला कोणा महा-दर्पण ।
बिंबाचें रविनें जिथें निज गमे केलें असें अर्पण ॥ ९६

---

१ परोपकार. २ आपल्या स्पर्शानें. ३ धर्मात वाखाणलेली. ४ आपल्या मंडळीसहवर्तमान. ५ संशय.

एका मागुनि एक त्यांत लहरी येतां तिथें दीसती ।
बिंदू ते रविकांतिनें धवलशीं मुक्ताफलें भासतीं ।
ओळीनें जडले हिरेच गमले ते पातळाच्या वरी ।
शेल्याच्या वरतीहि सुंदर वनश्रीचे जनां अंतरीं ॥ ९७
ओसंडोनि जलाशयांतिल[1] पडे शैलप्रदेशीं जल ।
होतें जें स्फटिकासमान बघतां दृष्टी रमे निर्मळ ॥
जोरानें पडतां कड्यावरुनि तें खालीं गभीर स्वन ।
घों घों चालतसे अ-खंड बुडवी आश्चर्य-पूरीं मन ॥ ९८
भासे दिव्य जल-प्रवाह पडतां चापापरी[2] वाकडा ।
कांचेचा तखताच कीं बसविला विश्वेश्वरें[3] फाकडा ।
सूर्याचीं पडुनी अ-संख्य किरणें तेजाळ त्याच्यावरी ।
पत्रा सोज्वळ रौप्य वक्र[4] गमला लोकांस अभ्यंतरीं ॥ ९९
विश्वाच्या जणुं वाटली विरचिली कारागिरें चांगली ।
मोठी भिंत कमानदार अथवा नामी हिऱ्याची भली ॥
पाणी भिन्न विभिन्न होउनि जवें त्याचा फवारा उडे ॥
इंद्राचें रविकांतिनें वर धनू[5] त्यामाजिं दृष्टी पडे ॥ १००
जोरानें उसळे जळ प्रतिपळीं तो फेन[6]-राशी दिसे ।
दुग्धाचा भरपूर पूर बरवा प्रत्यक्ष वाटे असे ।
किंवा हा अति शुभ्र बारिक अहा कार्पास हो पिंजला ॥
भासे कीं कण-संघ थोर सजला[7] हा कापराचा भला ॥ १

---

१ सरोवरांतील. २ धनुष्यासारखा. ३ जगाच्या नायकानें. ४ वाकडा, कमानदार. ५ इंद्रधनुष्य. ६ फेंसाचा ढीग. ७ थाटला, बनला.

शेजारीं वरल्या कडेस हिरव्या घांसें[1] समाच्छादित[2] ।
एकीच्या वर एक उंच दिसल्या त्या टेकड्या शाश्वत[3] ॥
त्यांच्याही वरती मधें विलसला शैलेंद्र अत्युन्नत ॥
नाना-वर्ण स-पुष्प तो तरु-गणीं अत्यद्भुतीं वेष्टित ॥ २
भुपाखंडल[4] आपणा निकट ये सन्मान्य हर्षें हंसे ।
पुष्पांच्या बहु शुभ्र शोभन वनाच्छन्नाद्रि[5] वाटे मिसें[6] ॥
तैसा डोलवितो शिरास निज तो वातेरितानोकहीं[7] ।
भासे थोर जनांस थोर असती कीं सादर प्रत्यहीं ॥ ३
अभ्राची पगडी शिरीं नव धरी साश्चर्य लोकां करी ।
वाटे पांघरला बरीहि हिरवी तो शालजोडी वरी ॥
पक्ष्यांच्या अमृताहुनी मधुरशा शब्दीं वदे स्वागत ।
तेणें तोष अ-वर्ण्य कवि न पवे राजेंद्र अभ्या-गत ॥ ४
ओपी गोड फळें फुलें सरस त्या सत्सेव्य तो पर्वत ।
तैसें शीतळ निर्झरोदक महत्सेवा गमे यद्रत ॥
वाटे पक्षि-रवें तयास मग तो बोले रसाळा गिरा[9] ।
आहे देख तुझा अहा समपणा अत्यंत हा साजिरा ॥ ५
माझीं उन्नत आसतीं ध्वज नृपा शृंगें[10] जशीं सुंदर ।
कीर्तीचे तव लागले चहुंकडे आहेत[11] हे शंभर ॥

---

१ गवतानें. २ झाकलेल्या. ३ नेहमीं असणाऱ्या. ४ ( भूप + आखंडल ) राजेंद्र. ५ ( वन + आछन्न + अद्रि ) वनानें झांकलेला पर्वत. ६ मिषानें. ७ ( वात + ईरित + अनोकह ) वाऱ्यानें हालविलेल्या झाडांनीं. ८ अतिथि. ९ वाणी. १० शिखरें ११ याचा कर्ता ' ध्वज. '

रत्नांची खनि मी करंडक तसा तूं सद्गुणांचा खरा ।
जीवा निर्झर - भुमि मी हि करुणा - सिंधूच तूं आसरा ॥ ६
मी जैसा लघु - शैल वेष्टित असें चित्तास आकर्षक ।
मंत्र्यांनीं निज युक्त तोवि असती वा तूं प्रजानायक ।
राज्य श्री - पति तूं सु - लक्षण वन - श्रीचा पती मी असें ।
मेघांतें धरिं मी शिरें बुधसभा त्वद्गेहिं मान्या वसे ॥ ७
तूं बा पाळिशि संग्रहीं नरपते शूरांस सिंहांस मी ।
तेणें तूंहि तसाचि मी परजना[1]नुलंघ्य आहों कमी ॥
आहे गा स्थिरतेमधें उभयतांमाजी नरेंद्रा वदें ।
कोण ? प्राज्ञ समान लेखिति सदां दोघांस हें शर्म दे ॥ ८
माथा धातुमय प्रिया चमकतो माझा रवीच्या प्रभे ।
उष्णीषें अथवा सरत्न मुकुटें सौवर्ण वा तूं सभे ॥
जेव्हां बैससि तो तुझा चमकतो तैसाच मन्नि[3]म्नगा ।
शेला रम्य तुझ्यापरी धवल मी आंगें धरीतों अगा ॥ ९
राष्ट्रीं दुष्ट परांस तापद तुझ्या तैसेच भीत्या[4]स्पद ।
संख्या[5]तीत सदैव राहति जसे माझ्या वनीं दुःखद ॥
लोकां थोर वि[6]खार हिंसक बहू शा[7]र्दूल ही लांडगे ।
घ्याया जीव तयार घोर करुनी जे नित्य सारे दगे ॥ १०

---

१ ( पर + जन + अनुलंघ्य ) दुसऱ्या लोकांना अतिक्रम करितां येत नाहीं किंवा ओलांडतां येत नाहीं असा. २ सुख. ३ माझी नदी हाच शेला. ४ भयाचें ठिकाण. ५ ( संख्या + अतीत ) असंख्य. ६ सर्प. ७ वाघ.

कांहीं चित्र - विचित्र - वर्ण असती नाना - कृती सुंदर ।
चित्तें सात्विक[१] मोर तेवि हरणें ऐसे दुजे शंभर ॥
प्राणी रानिं मदीय वास्ति करिती राज्यांत तुझ्या तसे ।
जें सौजन्य - गुणें समंजस जया भूतानुकंपा[२] असे ॥ ११
भूपा ऐक तथापि भेद इतका दोघांमधें वास्तव[३] ।
आहे सुष्ट तसेच दुष्ट सम मी लेखीं सदा यास्तव ॥
दोघे भूभृत[४] बा असों तरि गुणें तूं श्लाघ्य हें मी ह्मणे ।
दुष्टां दंडुनि शिष्ट पाळिशि जनां इत्यर्थ हा सांगणें ॥ १२

पृथ्वी.

त्वरा करुनियां निघे नृपति - वर्य आग्रा - पुरा
जयास पति पावुनी स्वमनिं हर्ष पावे धरा ॥
गजेंद्र परते जसा करुनि वप्र[५] - केली वनीं ।
प्रत - प्त अथवा सुखें विहृति[६] संपतां जीवनीं[७] ॥ १३
जया स्व - वश जाहले विषय मोठमोठे नव ।
मिळोनि आफगाण ही सु - भग सिंध तद्वैभव ॥
भराभर समुद्यमें अतुल वाढ पंजाब घे ।
स्वयें सतत भूप तो अ - चुक राजकार्या बघे ॥ १४

---

१ गरीब, शांत. २ ( भूत + अनूकंपा ) प्राण्यांविषयीं दया. ३ खरा. ४ पृथ्वीचें धारण करणारा—राजा, पर्वत. ५ दातांनीं जमीन खणण्याची क्रीडा. ६ विहार, क्रीडा. ७ पाण्यांत.

## राज्यव्यवस्था.

नृपाळ निवडी जनीं चतुर पारखी मौक्तिकें ।
तया समुचितीं पदीं करि विरुढ[1] तो कौतुकें ॥
प्रजेस सुखसंपदा अधिकृतां प्रतिष्ठा-भर ॥
वरी बहुत साजलें स-विधु[2] सक्ष[3] राज्यांबर[4] ॥ १५

कुशाग्र-मतिनें नृपें प्रथम पाहुनी देश हा ।
सुपीक बहुधा असे विपुल धान्य तें दे महा ॥
असे प्रमुख संपदा रुचिर चिंतुनी एथली ।
कृषीवल-गणां दिली सुनियमीं स्थिती चांगली ॥ १६

गणी नृप-शिरोमणी भरत-भूमि-देहीं भला ।
कृषीवल-गणास तो सतत ओपितो जो बला ॥
खरा परम चांगला सुदृढ पृष्ठ-वंशा[5] स्वयें ।
कधीं अबळ त्या ह्मणे करुं नये नृपें स्वोदयें ॥ १७

विचार करुनी मनीं सुपरिपक्क भूपाग्रणी ।
ह्मणे कुशल तो खरा वदति योग्य माळी जनीं ।
करी विटपिची[6] सदा उपवनांत जोपासना ।
मिळोनि फळ-पुष्प त्या स-फळ होय तत्कामना ॥ १८

तसा नृप कृषीवला सुपटु राखि नानापरी ।
स्वराष्ट्र-गत संकटीं मदत देउनी सावरी ।

---

१ स्थापित. २ चंद्रासहित असें. ३ (स+ऋक्ष) नक्षत्रांसहित. ४ (राज्य+अंबर) राज्य हेंच आकाश. ५ पाठीचा कणा. ६ वृक्षाची.

कृतज्ञ मग ते नृपा समह देति पट्टी सदा ।
मनीं विषमता कशी उभयतांत राहे वदा ॥ १९

शार्दूलविक्रिडित.

लंगोटी कमरेस जीर्ण फडकें लांडे जुनी मेखला ।
दोरी ठोसर कांबळें हि न नवें खांदां उनीं पोळला ।
पोरें बाइल हीं दिगंबर अशीं आहेत यत्संग्रहीं ।
नाहीं एक कपर्दिकाहि फुटकी राहे भिकारी गृहीं ॥ २०
खावें काय उद्यां कसा तरि अहो हा आजचा लोटला ।
आहे वासर मानसीं भडकला चिंताग्नि पोळी भला ।
ऐसे शेतकरी जया नृपतिच्या राज्यामध्यें आसती ।
जाळा त्यास गरीब बोलति खरी ही राक्षसी आकृती ॥ २१
जो राजा करभार दुःसह जना घे कोशं[1] लोभें भरी ।
थोडेसे अधिकारि पावुनि धना होती कुबेरापरी ॥
लक्ष्मी-पुत्र[2] परंतु संघ बहुधा लागे जनांचा भिके ।
नोहे तो नृप राक्षसेंद्र गणिला विद्वज्जनीं हें निकें ॥ २२
बोले गोड वरी सुधेपरि खरा विश्वास नाहीं जनीं ।
सारीही दुबळी प्रजा करुनिया हर्षाब्धि पावे मनीं ॥
झाला अंध तृणासमान गणि जो तीं[3] दुष्ट-धी श्रीमदें ।
पावे खास वि-नाश शेवटिं यशा अ-न्याय कोणा न दे २३
लोकांचे निज राज्य-पद्धति-वशें निष्किंचनत्वामुळें ।
जे होती बहु हाल देखुनि वरी नक्राश्रु[4] गाळी बळें ॥

---

१ जामदारखाना. २ श्रीमंत. ३ प्रजा. ४ कपटाचे अश्रू.

तो हा जो कपटी कठोर हृदयीं बोकाच वाटे जना ।
बाळांची निज भूक सत्य हरण्या साठीं करी योजना ॥ २४
डोळे नीट मिटोनि दुग्ध पिइ जो मार्जार लोभें छडी ।
नाणी मानसिं कीं बसे विधिवशें पाठीवरी ते बडी ॥
तैसा आत्मसुखार्थ नष्ट नृपती लोभें बुचाडी प्रजा ।
तो घातें नुमजे स्व-शत्रु समयीं भावील मोटी मजा ॥ २५
लोभाविष्ट नृपाळ शोषि अनयें आत्म-प्रजेच्या धना ।
युक्तीचे नव योजुनी प्रभुपणें नानाविधा साधनां[1] !
रक्त-प्राशक तो जना शठ[2] गमे मोठा जलौकेहुनी[3] ।
रक्ताच्या सुख दुष्ट[4] देइ बहुधा स्वांतास जी प्राशनीं ॥ २६
होता आक्बर भूप-सिंह न तसा नेमस्त घेतो कर ।
प्रेमें रंजवि राजरत्न सकलां होऊनि सौख्याकर[5] ।
मानी लोकसुखांत हर्ष-भर तो लोभा विषातें त्यजी ।
राजी त्यास निज-प्रजा बिलगली स्वांतांत तन्निष्ठ[6] जी ॥ २७
राजा तोडरमल्ल कल्पक रची धी-वारिधी कायदे ।
शांतांतःकरणें अपाप मतिचा लोकां नृपा फायदे ।
होती पासुनि ज्यांचिया उभयतांतें ही तरी आवडे ।
काळीचे परमेश भक्त सुकृतीं प्रेमा जयाचा जडे ॥ २८
राजा गुर्जर-देश घे जामिनिच्या तेथें व्यवस्था करी ।
राजा तोडरमल्ल निस्तुल जमाबंदी रणीं केसरी ।

---

१ उपायांस. २ वंचक. ३ जळवेहून. ४ हें विशेषण, 'रक्ताच्या' या. नामाचें. ५ ( सौख्य + आकर ) सुखाची खाणच केवळ असा. ६ त्यावर निष्ठा ठेवणारी.

मेधावीपण शौर्य निर्मळ अशा ह्या सद्गुणां सांगड ।
जेथें त्या निज भूप - शक्र गणिती कल्याणकारी गंड[1] ॥ २९

सोन्याच्या नव कोंदणीं वर हिरा निःसीम साजे तसा ।
भूपाखंडल शोभला सु - पुरुषें सन्मान्य ह्या फारसा ॥
कामाला नृपतीस येति असले जे शक्त भक्त स्वयें ।
राज्याचे दृढ खांब हेच असती त्यां वैरि कांपे भयें ॥ ३०

पारंब्या न वडास आश्रय महा दिग्मंडला तो कसा ।
व्यापी भूमिविणें तडाग न घडे चौफेर कीं पूर्णसा ॥
पायाला न चिरे बरे तरि कसें राहे वरी मंदिर ।
लोकीं साश्रय[2] वैभवास वरिती हें तत्व हो सुंदर ॥ ३१

केले त्यास दिवाण आक्बर - नृपें जो पक्षपाती गुणीं ।
होता जाति न धर्मही महतिचीं[3] तो कारणें हीं गणी ॥
विद्या - बुद्धि - विशिष्ट शूर - वर ते हिंदू पदा पावले ।
मोठाल्या यवनांपरी ह्मणति हें औदार्य आहे भलें ॥ ३२

स्रग्धरा.

मोठाल्या लष्करी तो वितरि नृप महा - थोर जागा उदार ।
राज्याचे मोंगलांच्या अति कुशल खरा जाणता सूत्रधार ॥
हिंदूंतें संशयाचें हृदय - गत अशा रीतिनें मूळ खंडी[4] ।
ठेवी विश्वास त्यांच्या वरि विनुत[5] जनीं बुद्धिमंतीं उदंडीं ॥ ३३

मात्सर्याचा न राहे अ - सुखद हृदयीं बिंदुही हो तदीय ।
प्रेमाचा पूर वाहे नृप - वर गणिती प्राण हा अस्मदीय[6] ॥

१ किल्ला. २ ज्यांस आश्रय आहे ते. ३ मोठेपणाचीं. ४ तोडी, नष्ट करी. ५ श्लाघ्य, स्तविलेले. ६ आमचा.

शौर्यं तच्छत्रु कांटे उपटिति सहसा हर्ष चित्तांत दाटे ।
दुःखाचा सिंधु आटे यवन निज अशी बुद्धि सर्वांत थाटे ॥ ३४
राजे ज्यांचा विराजे रजपुत अहिसा[1] हस्त युद्धीं अखंड ।
मानें ज्या लागि मोनें[2] महिवरि जगणें शत्रुचा काळदंड ।
वारा तो ही निवारा ह्मणति निजशरां[3] पारतंत्र्य - स्थितीचा ॥
ते होते आकबरातें स्व - वश गुण पहा सुज्ञहो तन्मतीचा ॥ ३५

शिखरिणी.

प्रजानाथें 'राजा'-पदवि बुधमान्यें बिरबला ।
स्वयें जात्या[4] विप्रा[4] वितरिलि गुणज्ञें सु - सरला ॥
खऱ्या विद्वद्रत्ना अधिकृति - शिरो[5] - भूषणिं जडी ।
वकीली तो वक्ता चतुर दरबारीं करि बडी[6] ॥ ३६
असे तो मेधावी[7] रसभरित वाणी वश ज्या ।
स्वभावें कल्याणी अभिनव करी पात्र विजया ॥
सभा - स्थानीं बोले निपुण वचनीं मोहक नृपा ।
गुणानें आकर्षी रसिक - वर संपादुनि कृपा ॥ ३७
विधात्यानें त्याचा स्मृति - फलक[8] बुद्धिस्थ रुचिर ।
असा केला होता प्रतिफलित[9] दृष्ट[10] श्रुतं[10] चिर ॥
जिथें सारें नेमें ठळक तितकें सुंदर टिके ।
नृपाळातें तेणें अतुल रुचला तो न लटिकें ॥ ३८

---

१ सापासारखा. २ आवडतें. ३ बाणांस. ४ जातीनें ब्राह्मण अशास. ५ श्रेष्ट अधिकारावर. ६ मोठी. ७ बुद्धिमान. ८ स्मरणाचा फळा. ९ प्रतिबिंबित. १० पाहिलेलें व ऐकलेलें.

स्वभावें आनंदी सु-रस-कविता[1]-सृष्टि-विधि तो ।
जनेंद्राच्या[2] प्रेमें सतत सहवासें विलसतो ॥
गुणी पावे लोकीं पद नुत[3] जनांहीं नियम हा ।
धरा ध्यानीं व्हाया गुण-युत[4] करा यत्नहि महा[5] ॥ ३९
सभेमध्यें योजी अ-चुक वदनें दिव्य वचनें ।
घरीं स्वांता[6] मोही सहज रसिकाच्या विरचणें[7] ॥
अशा सत्काव्यातें रणिं परजणें ही असिलता[8] ।
अशीं कामें ज्याची अधिक विलसे तद्रसिकता ॥ ४०
समीकीं[9] दुर्दैवें विषयिं अफगाणाभिध[10] पडे ।
कुवार्ता ही कर्णीं जिवलग सखा ऐकुनि रडे ।
दयाळांचा राणा अवनि-पति ढाळी ढळढळ ।
स्वयें अश्रु प्रेमें विकल विलपे तो बिरबल[11] ॥ ४१
करी ब्रह्मानंदा विरस रसिकांच्या अधिपते ।
अशा आनंदाचा झर सतत-वाहीच सुमते ।
सदा होउनी तूं प्रथम आजि दुःखीं ढकलिलें ।
कसें पीयूषाचें प्रखर विष हें होय नकळ ॥ ४२
कला रम्या होत्या अवगत जिवींच्या जिवलगा ।
न गंधर्वालाहि असातिल अशा त्या स्ववशगा ।

---

१ कविता रूप सृष्टि करणारा ब्रह्मदेव. २ लोकाधिपति म्हणजे राजा. त्याच्या. ३ स्तुत. ४ सद्गुण–युक्त. ५ मोठा. ६ मनाला. ७ रचणें–जुळणें. ८ तरवार. ९ युद्धांत. १० ( अफगाण + अभिधा ) अफगाण नांवाच्या. ११ हा ‘ पडे ’ याचा कर्ता.

श्रुतीतें श्रोत्यांच्या अमृत गमला गायन-रव ।
तुझा हस्तीं वाद्योद्गतहि रव भारी अभिनव ॥ ४३

मनें श्रोत्यांचीं तैं सहज तनु-भाना विसरती ।
तदा संसारींच्या विविध सहसा आधि सरती
न कालाची त्यांतें गति अचुक रंगांत समजे ।
पराकाष्ठा मोठी निरुपम सुखाची तयिं सजे ॥ ४४

पहा कीं गानाला हरिण पशु अत्यंत भुलती ।
कथा सज्ञानांची सुचतुर नरांची तरि किती ॥
सभा-रंगीं सर्वां करिशि जणु चित्रें विलिखितें ।
स्मृती त्याची चित्ता बहु असुखते पात्र करिते ॥ ४५

तुझ्या मत्संबंधें सुरस नव नानाविध कथा ।
जनीं आश्चर्याच्या प्रचलित खनी[1] ज्या सुख-पथा ॥
तयांतें दावीती सहृदय[2]-वरा वीर-विनुता ।
क्षणें त्वन्मृत्यूनें विष-विषम[3] होतील कथितां ॥ ४६

असें[4] ऐश्वर्याच्या नग-शिखरिं या वर्तत[4] कमी ।
नसे मातें कांहीं परि तुजविणें हीन[5] बहु मी ॥
खरा ह्या संसारीं जिवलगाच चिंतामणि नरा ।
हरी आधी[6] प्रेमें न वितरि असा तोष दुसरा ॥ ४७

हवें त्यातें बा मी करिन ह्मणतां ब्राह्मण तुवां ।
कसा घासायाचा क्रम खर तदा एक बरवा ॥

---

१ खाणी. २ रसिक लोकांत श्रेष्ट अशा. ३ विषासारख्या दुःसह-तीव्र.
४ वर्तत असें (मी), असा अन्वय. ५ उणा, कमी, बापडा. ६ काळजी.

विनोदानें केला तुजसि पुसतां उत्तर दिलें ।
' खराचा मी घोडा करित बसलों ' दे स्मृति भलें ॥ ४८

तुला मित्रा एके सहज दिवशीं वाक्य वदलों ।
विनोदें हें सारे धरणितल चर्मावृत[1] कळो ॥
करी त्वद्बुद्धीचा प्रसर चिर अव्याहत[2] जना ।
तदा बा त्वां केला प्रकट अपला योजकपणा ॥ ४९

नवा घालायाला चरणिं मज जोडा तयिं दिला ।
चला घाला चाला त्वरित धरणी सत्य सकला ॥
कृता चर्माच्छन्ना वदुनि सहसा कौतुक मिती ।
दिलें त्यातें नाहीं पतित करितें दुःखि अमितीं ॥ ५०

न जें देवा मित्रा काधिंहि करवें कार्य करिं मी ।
अशी पृच्छा[3] होतां जरि बहु असें त्याहुनि कमी ॥
वदे तें ये ध्यानीं तरि न चुकतां उत्तर दिलें ।
स्वराज्या[4] बाहेरी करिशिल नरा देवें न भलें ॥ ५१

सुचेना चित्ताला किमपि न उदासीन बनलें ।
गमे हें वाळूचें जग निरस मैदान सजलें ॥
तसें वाटे मातें स्थिरचर दिसें तें मृगजळ ।
न मी मोठे ज्ञानीहि फसति इथें नित्य सकळ ॥ ५२

---

१ ( चर्म + आवृत ) कातड्यानें मढविलेलें. २ अकुंठित. ३ प्रश्न. ४ तुझ्या राज्याला हद्द आहे म्हणजे तें परिमित आहे म्हणून तुला एकाद्यास हद्दपार करितां येईल, पण देवाचें राज्य अपरिमित आहे म्हणजे त्यास हद्द नाहीं म्हणून देवास कोणालाही हद्दपार करितां येणार नाहीं; हें तात्पर्य.

न द्याया संबंधी जवळ तनुला अग्नि वदला ।
तयाच्या कैवारी बुध निजजनांचा गवसला ॥
विपत्पाशीं त्यातें रवि-कर[1]-पवित्राग्नि सुपदा ।
अनाथातें नेईलच विलय पावूनि विपदा ॥ ५३

स्रग्धरा.

दिल्लीच्या वल्लभाला त्यजुनि अजि ह्मणे मित्र तो सत्य गेला ।
विश्वाच्या नायकाच्या जवळ मज गमे स्पष्ट भोगावयाला ॥
ऐश्वर्यं काळजीनें विरहित न जिथें मृत्युचा धाक चाले ।
प्राणी हे सान मोठे अ-वश परतती अंतिं जेथून आले ॥ ५४

शार्दुलविक्रीडित.

विद्यावंत कुशाग्र-बुद्धि बलवान् धैर्याब्धि जो निर्मल ।
केला मुख्य दिवाण भूम-पतिनें नामें अबुलफाजल ॥
मोठा कल्पक बोलका नर-मणी तर्कांत वाचस्पती[2] ।
'ऐनी आकबरी' रसाळ विलसे गंभीर ज्याची *कृती ५५
आधीं भुपति शिस्तवार मतीचा सद्वर्तनीं निश्चल ।
चालावें निज राज्य-यंत्र मति कीं निर्विघ्न हें सोज्वल ॥
त्याला भाग्यवशें हुशार नर जैं हा कारभारी मिळे ।
चंद्राच्या उदयांत अर्णव[3] तसा सानंद वाढे बळें ॥ ५६
फैजी नामक बंधु-रत्न विलसे त्यांचे[4] तयाचा असे ।
भुपातें सहवास ते उभयतां आकर्षिती त्यां[5] जसे ॥

---

१ सूर्यकिरण हाच पवित्राग्नि. २ बृहस्पति. * ग्रंथ. ३ समुद्र. ४ अबुल्फाजलाचें. ५ भूपास.

प्रेमें श्लाघ्यगुणांहि चुंबक[1]-मणी वेगें अयो-धातुला[2] ।
त्या सत्संगति लाभली जिस नसे ध्यायास योग्या तुला ॥५७
विद्वच्छेख-मुबारकात्मज बरा फैजी हिरा शोभला ।
लेखा माणिक अद्वितीय दुसरा भाग्यें पित्या लाभला ॥
त्यांतें धर्म महंमदी पढविला तत्वें तयाचीं तयां ।
होती ज्ञात सु-वाङ्मयास[3] तरले वादी वरीती जया[4] ॥ ५८
फैजी त्यांत कवी रसाळ मतिचा साहित्य-शास्त्रा[5] शिके ।
मेधावी हकिमींत होय बरवा धन्वंतरी कौतुकें ॥
भाग्यें आकबरा पुढें वर हिरा तो जाय एके दिनीं ।
जोहारी नृप ओळखी सहज तो कीं हा असे सन्मणि ॥ ५९
राखी त्या चतुराग्रणीस निज तो हर्षें सदा संग्रहीं ।
बोले शोभवितात पंडित अलंकार प्रभेनें मही ॥
नेमी त्यास गुणज्ञ आत्मतनयांसाठीं तयीं शिक्षक ।
कीं व्हावे क्षितिचे मनोहर पुढें ते सद्गुणी रक्षक ॥ ६०
तर्कें गर्क करी वदे अ-चुक तो वाणी जसा गीष्पति[6] ।
योजी यास्तव त्या वकील परराष्ट्रींही कधीं भूपति ॥
आहे दुर्गम काय त्यां महिवरी जे बुद्धिचे राक्षस ।
सिद्धी त्यांस गृहीत-कर्मि बहुधा होते सदाही वश ॥ ६१
जोडी तो 'कविराज' ही सुपदवी श्लाघ्या नृपापासुनी
एकानें अधिक प्रबुद्ध शत तो सद्ग्रंथ विद्वज्जनीं ॥

---

१ लोहचुंबक. २ ( अयस् + धातु ) लोखंडास. ३ चांगल्या विद्येला. ४ विजयाला. ५ अलंकार शास्त्रास. ६ बृहस्पति.

केले बोलति मान्य भूप रमला तद्बुद्धिच्या वैभवीं ।
विद्या निर्मळ हेंच सार हृदयीं मानी खरें या *भवीं ॥ ६२
त्याचा बंधु गुणाद्भुत प्रभु - वरा निःसीम तो आवडे ।
दोन्ही हात समान आसति परी श्रेष्ठत्व द[1]क्षाकडे ॥
व्यासंगीं रमला जना सकाळिका विद्यार्णवीं मीनसा ।
जो त्यावाचुन मानितो स्वहृदयीं निःसार सारी र[2]सा ॥ ६३
एक ग्रंथ रसाळ ज्यास विरची तो इस्फहानी कवी ।
ये हातीं जळका निमेनिम उभा त्याच्या जयाच्या रवी ॥
ज्ञानाचा सततोदयें विलसला विस्तीर्ण चित्तांबरीं ।
त्याची दुर्घट तो दुज्या परि तदा पूर्णा समस[3]या करी ॥ ६४
त्याची दैववशें जुनी गवसली त्यालागि एक प्रत ।
तीशीं ताडुन पाहतांचि जमली केली नवी सांप्रत ॥
सांगा अद्भुत काय त्यांत जडली विद्वद्वरीं भूप-धी ।
भृंगी पद्मि गुणज्ञ नोळखि गुणां हें तो घडेना कधीं ॥ ६५
तत्कालीन पिई समुद्र कृ[4]ति हा भासे अगस्त्यासम ॥
धर्म-ग्रंथ विलोकुनी विविध तत्प्रज्ञा ह्मणे तूं रम ॥
वि[5]द्वद्वृंद नृपासि तो निजसुखा साठीं जरी शोधितो ।
ह्या विद्वन्मणिच्या समागम-सुखा राजेंद्र हो शोधि तो ॥ ६६

---

*संसारांत. १ उजव्या हाताकडे. २ पृथ्वी. ३ एक, दोन किंवा तीन श्लोक–चरण दिले असतां त्यांतील अर्थास अनुसरून श्लोकाचा अवशिष्ट भाग रचतां तयार करून तो सगळा बनविणें त्याचें नांव समस्या पूर्ण करणें ४ ग्रंथ. ५ (विद्वत् + वृंद) विद्वानांचा समुदाय.

मोरातें वितरूं शके न समयीं गंभीर मेघ स्वयें ।
नादें मोद सरित्पतीस अथवा पोषी[1] विधु स्वोदयें ॥
तो आनंद अ-वर्ण्य पोष मतितें द्याया अबुलफाजल ।
भूपाच्या शकला अमोल गणिती धी-शक्तितें निर्मल ॥ ७४
धर्मी सर्व जुन्या नव्या बहुबरें सं-ग्राह्य आहे असें ।
त्या सद्विचार बादशाह-हृदयीं सत्तत्व मोठें वसे ॥
जाणा एक दुजें नृपास सम ही सारी प्रजा राखणें ।
हे बीजांकुर वाढले सुमतिच्या योगें असाधारणें ॥ ७५
त्या योगें जमती विशारद[2] महा तत्वज्ञ फतेपुरीं ।
नाना-धर्म-मतांतरीं गुरुदिनीं सच्छारदा मांदिरीं ॥
वादीं तर्क-कठोर विप्र यवन ख्रिस्ती तसे पारसी ।
सोनें हीन विशुद्ध तन्मत ठरे लागोनि खासें कसीं ॥ ७६
मोठाले यवनांतले प्रमुखसे काजी[3] तसे मौलवी[4] ।
ज्यांतें बादशहा समान-मतिचा[5] पर्यंक तो गौरवी ॥
धर्मी तत्व सखोल अन्य असतां तें सर्व मिथ्या कसें ।
अन्यांनीं पुसतां निरुत्तर मन प्राज्य भ्रमें चक्रसें ॥ ७७
[6]एका हस्तिं कृपाण तीव्रहि दुज्या हस्तीं कुराण क्रम ।
स्वीकारून न विश्वसोन करणें धर्मांतरस्थ भ्रम ॥

---

१ पुष्टीस. २ अनेक धर्मांतील भिन्न भिन्न मतें जाणण्यांत विशारद म्हणजे निपुण असे. ३ न्यायाधीश, धर्माधिकारी. ४ विद्वान् मुसलमान. ५ समतेच्या बुद्धीचा मंचक. ६ हें बोलणें अबुलफाजलाचें दुसऱ्या मतवादी व दुराग्रही मुसलमान विद्वानांशीं चाललें आहे, असें समजावें.

नाहीं काय तुम्हांस वाटत बळें विश्वास शांतिप्रद ।
आहे धर्म-पथांत तत्व नुमजे सर्वां कसें शर्मद ॥ ७८
काजीसाब तुह्मी तिरस्कृति करां अन्यां ह्मणा काफरं[1] ।
विश्वाच्या जनकास संतति दुजी नाहींच कां साक्षरं[2] ॥
सांगाहो नसतात मार्ग बरवे एका स्थळा शेंकडों ।
जाया काय ? अपार दोष मतिचा हा मोह-नाशें झडो ॥ ७९
आहे काय बघा अहो सुनि-शिया* -पंथांत मेळ भ्रमें ।
अन्योन्यांस पहातसा निशिंदिनीं पाण्यांत कीं संभ्रमें ॥
बोला तो[3] मग भिन्न-धर्म-पथिं ये दृष्टी न कोणाकडे ।
याचा येइल दोष मानसिं धरा कां व्यर्थ हो वाकडे ॥ ८०
जो ज्याचा निजधर्म तोच वितरी त्यातें खरें सौख्य ही ।
श्रीकृष्णोक्ति पुरातनीं बहुबरी वाटे मला प्रत्यहीं ॥
द्वेषातें न करा मनीं समपणा सोनें सुखें बाळगा ।
कोणातें न छळा स्वकीय समजा सन्मार्ग दावा जगा ॥ ८१

---

१ विधर्मी लोकांस मुसलमान लोक काफर असें ह्मणतात. काफर म्हणजे नीच, ठक, खऱ्या देवाला सोडून भलत्याची पूजा करणारे. २ (स+अक्षर) विद्वान्. * 'सुनी' आणि 'शिया' हे दोन्ही मुसलमानी धर्मपक्ष होत.—'सुनी' हे कुराण व पुढे निघालेले संप्रदाय या दोहोंस प्रमाण मानितात, व पैगंबरानंतर झालेले चार खलीफ यांना हे पूज्य मानितात. 'शिया' हे केवळ कुराणास प्रमाण मानितात, व पुढें जे संप्रादाय निघाले त्यांजवर यांची श्रद्धा नाहीं. पैगंबरानंतर जे तीन खलीफ झाले त्यांस हे पूज्य मानीत नाहींत. हे लोक बहुतकरून मक्केची यात्रा न करितां हुसेनाचे मृत्यु-स्थान जें 'करबाळा' तेथें जातात. हे मोहरमचा उत्साह करितात. 'सुनी' हे ह्यांना पाखांडी म्हणतात. ३ मेळ.

आह्मी ज्यास ह्मणों सदैव वदनीं बोले अबुल्फाजल।
अल्ला ख्रिस्त-पथानुयायि जगताचा ह्या प्रभू प्रांजल ॥
विष्णू वैष्णव शंभु शैव ह्मणती शक्ती स्वहृत्संमता।
विद्वान्बोलति शाक्त ह्या जगिं समस्तांचाहि तो रक्षिता॥८२
त्याचा आक्बर हा असे प्रतिनिधी एथें प्रजापालक।
लोकांते निरखी समान हृदयीं सर्वांहि तद्बालक ॥
देवें[1] तो मज आधिपत्य दिधलें भोगार्थ ना आपल्या।
तद्रक्षार्थ[2] ह्मणे सदा स-करुणें सन्मार्ग-योगें भल्या ॥ ८३
अग्नी सूर्य जलादि[3] वंद्य असती देवांश जन्मांतर[4]।
जीवा संभवतें स्वकर्म-वशगां देह-क्षयानंतर ॥
नैकस्त्री[5]-पतिता नरांस विहिता सुंता[6] प्रभूपासना।
दीक्षा[7]-दान न गाइलागिं वधणें 'दीने इलाही[8]' गणा ॥ ८४
'अल्ला* आक्बर† हो‡' असें वचन तो लोकां खुणेचें वदे।
द्व्यर्थी§ तद्धृदयांत बिंबुनि वसे तें नेहमीं शर्म दे ॥

---

१ देवी. २ (तत् + रक्षा+अर्थ) त्या बालकांच्या रक्षणाकरितां. ३ (जल+आदि) पाणी गाय, वनस्पति वगैरे पदार्थ देवाचे अंश आहेत असा समज होता म्हणून ते वंद्य असें ह्मटलें. ४ जीवास मरणानंतर त्याचें अन्य योनींत जन्मणें. ५ (न + एकस्त्री + पतिता) अनेक बायकांचा पति (नवरा) असणें म्हणजे पुष्कळ बायका करण्याची मोकळीक असणें. ६ हा एक मुसलमानांतला धर्म संस्कार आहे. ७ धर्माची दीक्षा देणें. ८ हें आक्बरानें स्थापिलेल्या नवीन धर्माचें नांव. * 'अल्ला हो आक्बर' हें वाक्य आक्बर आपल्या नवीन धर्माची दीक्षा लोकांस देण्याचे वेळीं त्यांस सांगे. † ह्या शब्दाचे अर्थ दोन आहेत:—एक, 'मोठा,' व दुसरा अकबर बादशाह. ‡ होय. § दोन अर्थांचें बोधक.

अल्ला ह्यास्तव थोर अर्थ पहिला आहे गमे त्यां असें ।
आहे आक्बर भूप ईश्वर असा अन्यार्थ सांगे रसें ॥ ८५
सूर्या भूप जगांत दृश्य विभुची मान्या विभूती[1] ह्मणे ।
झाली सृष्ट तदीय मूर्त करुणा त्याच्या[2] सुखा कारणें ॥
पाणी शोषुनि हा पवित्र किरणीं पर्जन्य पाडी पुढें ।
ह्याचा स्तुत्य सुधी अवर्ण्य महिमा वर्णावया बापुडे ॥ ८६
तेजस्वी रवि हा निजोष्ण-किरणीं चैतन्य[3] देई जनां ।
आणी दृष्टि-पथांत वस्तु सगळ्या संतोष ओपी मना ॥
सारेही नर सान थोर करि हा आसक्त कर्मी निज ।
येऊनी उदया प्रफुल्ल करि ही पृथ्वी जणों वारिज ॥ ८७
ह्याच्या पंडितमंडळी गुण-गणीं संतुष्ट हो अंतरीं ।
टेवी अंबर-रत्न भास्कर अशीं अन्वर्थ नामें तरी ॥
देतो ताप तथापि मित्र ह्मणती आश्चर्य वाटे मना ।
लोकीं ह्या गुणसंघिं दोष दडतो हे ना असत्कल्पना ॥ ८८
आहे कारण पावसाशि रवि हा वायु प्रवाहासही ।
कांतीचा झर तीस नित्य पसरी जाणे समस्ता मही ॥
नाहीं काय यथार्थ नांव असल्याला लोक[4]-बंधू असे ।
सांगा स्पष्ट तया सहस्र-कर कीं संज्ञा[5] अयोग्या असे ॥ ८९
कैसा पेटत राहि अंबरिं सदा वाटे अतर्क्याग्नि हा ।
शास्त्रज्ञांसहि पोटिं जागृत असे हें जाणण्याची स्पृहा[6] ॥

---

१ तेजस्वी मूर्ति. २ जगाच्या. ३ चेतना जीवकला. ४ लोकांचा मित्र. ५ नांव. ६ इच्छा.

आकर्षी फिरवी ग्रहांस[1] उजळी तेणें 'ग्रहांचा पती'।
तेजस्वी अधिकार चालवि जगीं मानी मदीया मती ॥ ९०

मंदाक्रांता.

नाहीं कांहीं स्थिर जगिं असे सर्वही[2] दों दिसांचे।
माया-मोहें मनिं न उमजे मानवां लागि साचें ॥
स्वप्नींचा तो सकल असतो जेवि खोटा पसारा।
देई मोठा कितिक म्हणती संसृती ताप सारा ॥ ९१
द्रव्यें मद्यें अधिकृतिवशें मत्त झाल्या नृपातें।
प्रार्थायाला क्षणिक सुख तें द्यावया कोण जातें ॥
त्यातें जातों शरण म्हणती रक्षिण्या भक्त जागा।
देवाजी जो मुख पसरण्या तोच कीं युक्त जागा ॥ ९२
ज्याच्या पाशीं कधिं न मिळतो चाढ लोकांस थारा।
ज्या पासूनी सतत असतो दूर अन्याय सारा ॥
यत्प्रीतीला सुखद बरव्या स्वप्निंही खंड नाहीं।
त्या विश्वाच्या शरण रिघतों राजयातें सदाही ॥ ९३
ज्याच्या पाशीं कधिं नच असे जाणिवेलागि[3] तोटा।
लोकां पीडा विण दिधलिया कोश ज्याचाहि मोठा ॥
ज्यातें रामा करूं न शकती क्षुद्र कामांध मंद।
त्या राजेंद्रा अह्मि ह्मणतसों मानसा शीघ्र धुंड ९४

---

१ बुध, शुक्र, गुरु इत्यादिकांस. २ एथून पुढें नव्वद श्लोकापर्यंत भगवद्भक्ताचें स्वमत-प्रदर्शन आहे. ३ ज्ञानाला.

ज्याला नाहीं कधिं बघितला फौज-फाटा शिबंदी ।
ज्याचे ज्ञाते जगिं विलसती जागजागेस बंदी ॥
एकाकी जो न भुल पडतां विश्व-संरक्षणाला ।
संपादी त्याविण न कधिंही जाउं देऊं क्षणाला ॥ १५
डोळ्यांतें जो दिसत न कधीं आणि सर्वत्र राहे ।
जीं जीं कर्मैं जन करिति तीं गुप्त राहून पाहे ॥
ज्याच्या अंगीं ह्मणुनि न कधीं चार-चक्षुत्व येतें ।
त्या लोकेशा शिर नमविणें सांद्र[1] आनंद देतें ॥ १६
जो भक्तांचे अनवरत[2] ही मंतु[3] पोटांत घाली ।
ज्या तोषाया नलगति कृती[4] माजवीत्या[5] अघाली[6] ।
ज्याच्या पथें कधिंहि दिसते मत्सराची न बाधा ।
त्याच्या गाऊं अभिनव यथा-शक्ति लीला अगाधा ॥ १७
ज्याच्या पाशीं असुख हृदयीं आणि बाहेर हांसें ।
काढायाची गरज न जना धैर्य भीतीस हांसे ।
बोलायाची अटक न जिथें कोणत्याही प्रसंगीं ।
तद्ध्यानाच्या क्रमुं सुखकरीं काळ हा क्षिप्र संगीं ॥ १८
सर्व-द्रष्टा कळकळ मनीं येउनी दीन तारी
जो नम्रांचा[7] सतत गणिला पावनीं[8] संकटारी[9] ।

---

१ दाट, मोठा. २ नेहमीं. ३ अपराध. ४ कामें. ५ वाढविणाऱ्या. ६ ( अघ + आलि ) पातकांची पंक्ति. + चार ह्मणजे लोकवार्ता समजावयासाठीं पाठविलेले दूत, ते ज्याचे चक्षु म्हणजे डोळे आहेत तो चारचक्षु ( राजा ) त्याचा धर्म. ७ शरण आलेल्या लोकांचा. ८ पवित्र पुरुषांनीं. ९ ( संकट + अरि ) संकटांचा शत्रु.

जो एकत्वें अतिशय मनीं कोंवळा मायबाप ।
विश्वाचा त्या जवळ करितां या शिवे काय पाप ९९

स्रग्धरा.

विश्वाचें रम्य कोडें बहुत बिकट हें निर्मिलें शिल्पि-वर्यें ।
केलें जें सोडवाया करितिल करिती यत्न अत्यंत धैर्यें ।
प्राज्ञांचे संघ संख्या-विषय न असती ते अखेरीस मोहीं ।
येऊनी हातटेकीस न पडाति वचें शक्त होती विदेही ४००
आकाशीं उंच जातां त्वरित मग पुढें उंच तें फार जाय ।
त्याचा लागे न ठाव प्रतिहत फिरणें होउनीया न काय ।
लागे मागे त्वरेनें सतत खगवरा ती गती पंडितांची ।
विश्वाच्या ज्ञान-मार्गीं अवचट घडते खोल हे गोष्ट साची १
ऐशा ह्या सद्विचारीं सराति बहु निशा मान्य तत्वें ठरोनी ।
द्वेषाचा वा हठाचा[1] त्यजिति मळ मती[2] ऐक्य पक्षांत दोनी ।
वादानें सत्प्रमाणीं नियमित निपजे ज्ञान लोकांत वाढे ।
जो तो ह्या मंदिरा ये बुधवर विवरीं ज्ञान आत्मीय गाढें २

शिखरिणी.

ग्रंथांचा नृपराज संग्रह करी शास्त्रीय नानापरी ।
रत्नें तीं बरवीं सदा मम वदे तो पारखी वैखरी ।
पाया हा निजराज्य-मंदिर-बुध-प्रीत्यर्थ मानप्रद ।
बांधायास दृढ प्रजाधिप असा घाली स्वयें शर्मद ३

---

१ दुराग्रहाचा, बलात्काराचा. २ बुद्धि.

इंद्रवज्रा.

एका हि कोटें नगरी विशाला। राहों न दे ज्ञान-निधी वि-शाला[१]।
आनंद-सिंधूंत करी निमग्न। लोकां तदज्ञान करूनि भग्न॥ ४
धिप्पाड देहीं असले शिपाई। निर्भीक चित्तीं जमवी उपायीं।
राखी तयांतें धन-मान दानें। सोत्साह सेना नृपतीस वाने॥ ५
संख्या व्यवस्था गुण मुख्य दोन। राखून राज्यावन[२] तो नदीनें[३]।
सेनेंत संपादि हि सद्गुणांचा। तो वज्र तच्छत्रु खरेच काचा॥ ६

## फत्तेपूर शिक्री.

गीति.

आनंदें उत्साही बांधी राजेंद्र एक दिव्य पुरी॥
मोहक जीची रचना केली कारागिरीं महाचतुरीं॥ ७
जेथें सदनें वदनें वदवेनाताचि अशीं गगन[४]-गामी॥
धनवंतांचीं शोभति कैसा वर्णूं शके पुर-नगा[५] मी॥ ८
शेख-*सलीमाख्य इथें केली वस्ती पुरा फकीरानें॥
जो ईश-भक्त मानी सम उद्यानें असोत कीं रानें॥ ९
नृप-वर्य महात्म्याचा त्या वारंवार दर्शनाकांक्षी[६]॥
जाय प्रतप्त गज सरा ऐहिक[७] यद्वृय विषय[८] नाकांक्षी॥ १०

---

१ जींत पाठशाला नाहीं अशी. २ ( राज्य + अवन ) राज्याचें रक्षण. ३ सद्गुणांचा नदीन ( समुद्र ) असा अन्वय. ४ फार उंच. ५ पुर हाच अलंकार त्यास. * ( शेखसलीम + आख्या ) ' शेखसलीम ' ही आहे आख्या म्हणजे नांव ज्याचें अशा. ६ दर्शनाची इच्छा करणारा. ७ इहलोकींचे. ८ विषय = पदार्थ.

संपत्तीच्या मागें तो नव्हता तीच निस्पृहा पाठीं ॥<br>
लागे सुंदर तकिया[†] बांधी नृप थोर एक त्यासाठीं ॥ ११<br>
वेळोवेळीं भजनीं सादर त्याच्या नृपाळ तो शतदा ॥<br>
जाय सुतांशीर्वादें[1] करि तो त्या धन्य पूरिताश[2] तदा ॥ १२<br>
नृप लाभे सुत-रत्ना सलीम हें नाव पूज्य त्या ठेवी ।<br>
तो कृतकार्य कृतज्ञ प्रभु तें[3] दे सुख तशा न त्या ठेवी । १३<br>
आनंदें राजेंद्र प्रासादोत्तम[4] उदार एक रची ।<br>
द्रविण[5] अपार विलक्षण कौशल्यास्तव कुबेरसा खरची ॥१४<br>
एकानें दुसऱ्यानें तिसऱ्यानें ह्या अनुक्रमें हर्म्यें ।<br>
अहमहमिका[6] धरुनि बहु सरदारीं बांधिलीं पुढें रम्यें १५<br>
गुजराथ-रणीं झाली नृपसिंहाची चमू तया विजयी ।<br>
फत्तेपुरोपपद[7] ही शिक्री केली समुत्सवें समयीं १६<br>
थोरांनीं करिं धरितां प्रेमानें अल्पही बने थोर ।<br>
मिळतां नृपाश्रय कसें खेडें वाढे धरूनिया जोर १७<br>
कमलापरि तें साजे पुर त्यांत श्रेष्ठ कर्णिकाकार[8] ।<br>
प्रासाद दिसे पत्रें हर्म्यें भोतीं मनोज्ञ जीं फार १८

---

† आश्रय, मंदिर. १ ( सुत + आशीर्वाद ) मुलगा होण्याच्या आशीर्वादानें. २ ( पूरित + आशा ) पूर्ण झाली आहे आशा ज्याची असा. ३ सुत-रत्न. ४ ( प्रसाद + उत्तम ) उत्कृष्ट राजवाडा. ५ धन. ६ मी आपली इमारत तुजपेक्षां सुंदर व लौकर बांधीन अशी परस्परांस होणारी अहंकाराची बुद्धि. ७ 'फत्तेपुर' हें आहे उपपद जीस अशी 'शिक्री' ह्मणजे फत्तेपुर शिक्री. ८ ( कर्णिका + आकार ) कमळांतील वाटीच्या आकाराचें. श्रीमंत लोकांचे वाडे.

'विद्यामांदिर' नामें दिव्य इमारत तिथें उठविली हो ॥
विद्वत्समागमात्मक पीयूषाचा जिथें मिळे लाहो ॥ १९
ज्ञान खऱ्या सौख्याचा अखंड आहे अमोल हा कंद ॥
मानव-संघास जसा *उच्छ्रित फलयुत † पिकास ‡माकंद॥२०
चिंतुनि हें बादशहा ज्ञान-निधी साठवी इथें राशी ॥
सद्ग्रंथांचा मिळतां दुर्मिळ परि लिखित जो महायासीं॥ ११
गंगा-यमुना-संगमिं अलहाबादेस भव्य गिरि-दुर्ग ॥
एक उभारी नृपवर आहे जे मूर्तिमंत अरि-दुर्ग ॥ २२
स्मारक मारक रिपुचें भूपाचें स्व-कृत वाटतें स्वांता ॥
परसेनांत धसेना यदाक्रमीं वीर-संग भी §स्वांता ॥ २३
परगर्वोच्चाटन-पटु नृप-शक्राचें सुकीर्त्यचल[1]-शृंग ॥
यद्वर्णनांत तन्मय कविमन गुंते गमे कमल-भृंग ॥ २४

## अबुलफाजलाचा वध.

शार्दूलविक्रीडित

येतां दक्षिण-देश सोडुनि पथीं निश्चित संहारिला ।
ओर्छोंच्या[2] पतिनें विदुष्ट-मतिनें विश्वास-घातें इलीं[3] ॥
केली मित्र-विहीन खिन्न-मति [4]मी झालों अबुलफाजेल[5] ।
बोले आकबर धीर-धीहि नयनीं ढाळी असूचें जळ ॥ २५

---

* उंच. † कोकिलास. ‡ आम्रवृक्ष. § आपल्या अंतास म्हणजे नाशास.
१ सत्कीर्तीच्या पर्वताचें शिखर. २ ओर्छा संस्थानच्या राजानें—आकबराचा अबुलफाजलाविषयीं फारच स्नेहभाव होता, तो राजपुत्र सेलीम ह्यास सहन न होऊन त्यानें ओर्छाच्या राजाकडून विश्वासघातानें त्यास मारविलें. ३ पृथ्वी. ४ आकबर. ५ हें 'संहारिला' या क्रियापदाचें कर्म.

स्रग्धरा.

मांगाची जीवघाती कृति करि कपटी जन्मुनी सत्कुलांत ।
जातीचा थोर लोभी विसरुनि सगळें वृत्त एका पळांत ॥
स्वोत्कर्षासाठिं भारी अधमपण धरी हें सले शल्य पोटीं ।
रत्नांच्या खाणिमाजीं विमल निपजली सत्य ही गारगोटी ॥ २६

शिखरिणी.

अभावें दुष्टांच्या विष-विषम पृथ्वी-तल वर ।
सदिच्छावंतांतें अमृत गमतें बोलति नर ॥
जरी देवें सर्पाविण विरचिली सृष्टि असती ।
तरी होता लोकां सुखद विटपी[3] चंदन किती ॥ २७

शार्दूलविक्रीडित.

वार्तेनें खवळे नृपाळ हृदयीं जो कोंवळा विह्वळ ।
दातांनीं अधरोष्ठ-भाग रगडी संक्षुब्ध दावानळ ॥
जाळी वैरि-तृणास तुच्छ सहसा तो सत्य ओर्छापति[1] ।
प्रेषी सैन्य वधावया परि छपे तो सर्वदा पर्वतीं ॥ २८
कांहीं काळ नृपाळ शोक-जलधी मध्यें बुडे मीनसा ।
भासे[2] सर्व सुणें तया जग ह्मणे निःसार झाली रसा[4] ॥
गेला दीप मनो-गृहीं अ-सुख हा अंधार माजे भला ।
माझा मित्र अमोल रत्न वधिला कां लाभ वाटे खला ॥ २९

---

१ ह्याचा कर्ता ओर्छांचा पति, अध्याहृत. २ वाटलें असतें. ३ वृक्ष. ४ पृथ्वी.

माझ्या दुष्कृति[1] ज्या कधीं विधिवशें हस्तांतुनी जाहल्या ।
वाणीनें ममताळु बोध करुनी त्या पाहिजे वर्जिल्या ॥
सांगों काय ह्मणे मदीय गुण जे अत्यल्पही शैलसे ।
मोठे वाटति ज्यास जीव[2] मति ही मी अंतरंगीं वसे ॥ ३०
माझ्या वांचुनि चैन तूज न पडे गेलासि तूं एकटा ।
कैसा स्वर्ग सुखोपभोग करण्या कैसा तरूं संकटा ॥
एकाकी* वद राज-नीति-कुशला नौका‡ गमावून मी ।
होतों पूर्ण-सुखांत पूर्ण विधुसा झालों नशीबें कमी ॥ ३१
तें विद्वत्व रसज्ञताहि पटुता वाक्यांत तर्कान्वित ।
तैशी सांग नरोत्तमा सुजनता मानार्हता संस्तुत[3] ।
खाशी निःस्पृहता दया-घन[4]-पदीं निःसीम ती लीनता[5] ।
चित्तौदार्य[6] कुठें समस्त गुण हे एकत्र पाहूं अतां ॥ ३२
ग्रासी मोह पुनःपुन्हा स्व-मतिला सर्वस्व गेलें गमे ।
जीवावांचुनि देह तेवि न रुचे मित्रा तुझ्या संगमें ॥
हें सारें मम राष्ट्र[7] हीन चतुरा चंद्राविणे *शर्वरी ।
किंवा भव्य तलाव जो परि जलाभावास[8] तापें§ वरी ३३
बापा चालति पाय हात करिती नेमें स्व-कर्में बरी ।
शब्दांचा गण ये मुखांतुनि दृढाभ्यासें जरी लौकरी ॥

---

१ वाईट कर्में. २ अकबर त्याचा केवळ जीव. * एकटा. ‡ नांव. ३ वाखाणलेली. ४ दयेचा केवळ मेघच जो ईश्वर त्याच्या चरणीं. ५ तत्परता. ६ ( चित्त+औदार्य ) मनाचा मोठेपणा. ७ ह्याचा अन्वय 'हीन' या शब्दाकडे. * रात्र. ८ ( जल + अभाव ) जलाचें नाशास. § उष्णतेच्या तापानें.

सारा ही स्व - विचाररूप मतिचा ओघ *प्रबुद्धा तुला ।
सोडीना क्षण एक ही सुख तई भासे न त्यातें[1] तुला ३४

## सती.

गीति.

दयितेनें पति जाता स्वर्गातें आत्मदेह होमावा ।
त्याच्या चितेंत विधि हा समिद्ध[2] अतिभयद काय हो गावा ३५
त्यातेंच सती जाणें ह्मणती प्रेमें विरक्त त्या महिला ।
गणिती त्या शुभ - लोका गेल्या पतिसहित सोडुनी महिला[3] ३६
स - दय - हृदय तो भू - पति कळवळला पाहुनी अशी चाल ।
वांछी बंद कराया ललनांचे[4] जाणता† स्वयें हाल ॥ ३७
इच्छे विरुद्ध तीच्या आग्रह अबलेस जो सती जाया ।
कोणी करील त्याची होइल दंड्या ह्मणे नृपति काया ॥ ३८
पति गेला काय इणें केला अपराध त्यांत देहांत‡ ! ।
काय ह्मणुनि ही शिक्षा नाहीं आधार त्यास वेदांत ॥ ३९
क्रव्यादा[5] पासुनि हा दयालु राखी अनेक मग बाया ।
व्याघ्र - मुखांतुनि वाटे ओढी जीवंत धीर तो गाया[6] ॥ ४०
बहु स - दय इंग्रजांनीं कधींहि जाणें सती न अबलांनीं ।
हा कायदा सु - निश्चित केला कनवाळु त्या सु - जन वानी ॥ ४१

---

* हे विद्वान् अशा अबुल्फाजला. १ बरोबरी, साम्य. २ पेटलेल्या. ३ पृथ्वी-ला. ४ स्त्रियांचे. † विचारणीय गोष्टींचा एकमार्गी विचार होऊन दुराग्रहानें ही सती जाण्याची चाल पडली असावी इत्यादि जाणणारा–ज्ञानी. ‡ ( देह + अंत ) देहाचा नाश–मरण. ५ चितेच्या अग्नीपासून. ६ गाई.

विसरूं कसें लिहाया बेंटिंकाचें[1] कृतज्ञ मी नांव ।
आंग्लवराचें यत्कृति[2] अबलांते जाहली अशी नावें[3] ॥ ४२

## समारंभाची स्वारी.

गीति.

भूपाच्या जन्म-दिनीं विषुव[4]-दिनींही महोत्सवा करिती ॥
जन-मोद[5]-सिंधुला ये नृप-मह[6]-चंद्रोदयें महा-भरती ॥ ४३
मंडप किनखाबी बहु उन्नत विस्तृत उभारिती त्यांत ॥
उंच मधोमध मांडिति सिंहासन मणि-सुवर्णमय कांत[7] ॥ ४४
रांगांनीं दों बाजुंस ठेविति विस्तीर्ण शेकडों मंच ॥
मखमालीनें आवृत बहु मृदु बसण्यास आसनें उंच ॥ ४५
जागोजाग तदा ध्वज उच्छ्रित[8] उभाविति यदीय जरिपटके ॥
रवि-कांतीनें झळकति दिपविति नेत्रांस खेद मनिं न टिके ॥ ४६
अहमहमिका धरुनि ते जाति गमे अंबरासि गांठाया ॥
पवन-चल[9]-पट शिरें जणु डोलविती उंच जाउनी ठाया ॥ ४७
नगरीं प्रातःकालीं उठोनि आबाल-वृद्ध सानंद ॥
या दिनिं राहति जन्मे कीं गुणवान् भूप लोक-सुख-कंद ॥ ४८

---

१ हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल. इ. स. ( १८२८–१८३५ ) लॉर्ड बेंटिंक ह्याचें. २ ज्याची वरील कायदा हीच कृति. ३ संकट तरण्याचें साधन—नौका. ४ रात्र आणि दिवस ह्यांचें मान सारखें असणें ह्यास विषुव असें म्हणतात. हें मान वर्षांतून मेषसंक्रांत आणि तुला संक्रांत ह्या दोन दिवशीं असतें; त्या दिवशीं. ५ लोकांचा आनंद हाच समुद्र त्यास. ६ राजाचा महोत्सव हाच चंद्रोदय त्यानें. ७ सुंदर. ८ उंच. ९ वाऱ्यानें हलणारीं वस्त्रें हींच डोकीं.

जिकडे तिकडे वाजति मंगल-वाद्यें पुरांत जन अंगा ।
प्रेमें अंगोद्वर्तन[1] लाविति आधीं करूनि अभ्यंगा ॥ ४९
उष्ण-जल-स्नात पुढें उत्तम पोषाख लेउनी अंगें ।
सालंकार निघाया तयार होती पुढें नृपति संगें ॥ ५०
स्वारीच्या पुढति तदा मंद्र-ध्वनि[2] थोर चवघडा वाजे ।
घन-गर्जनाच होते अ-समयिं[3] भासे जना असा गाजे ॥ ५१
वाजति शिंगें करणे लांब तुताऱ्या मनोज्ञ सनायाही ।
डंके नौबति ताशे होती जन हृष्ट अंतरीं यांहीं ॥ ५२
अरि-धूमकेतु[4] तोफा करणाऱ्या शत्रुचे रणीं तुकडे ।
चालति गोलंदाजा-सह य-न्मति पूर्ण कीर्ति-हेतुकडे ॥ ५३
पुष्ट अशा मल्लांच्या चालति रांगा पुढें करुनि छाती ।
जाणों देहें स्वबळें उत्साहें भीमसेनसे जाती ॥ ५४
चपले पारि तेजस्वी चमकत हस्तांत तीव्र तरवारी।
संघ शिपायांचा जो चाले व्यसनास शीघ्रतर[5] वारी[6] ॥ ५५
फडके ध्वज दिल्लीच्या नाथाचा भव्य कांचना पारिस ।
झळके प्रतापॅ[7]-संभव ते जें देणार ताप जो अरिस ॥ ५६
सादी सैंधव-पृष्ठीं[8] जाती आरूढ नीट ओळीनें ।
पाठीस ढाल बांधुनि कटिला तलवार खेंचित खलीनें[9] ५७

---

१ उटी. २ गंभीर आहे ध्वनि ज्याचा असा. ३ अवेळीं—त्याची योग्य वेळ नसतां, भलत्याच वेळीं. ४ शत्रूंना अरिष्ट सूचक अशीं शेंडेनक्षत्रेंच. ५ फार लवकर. ६ नाहींसें करितो. ७ पराक्रमापासून आहे उत्पत्ति ज्याची अशा. ८ घोड्याच्या पाठीवर. ९ लगाम.

दूरुनि परबल-हनन-क्षम घेउनि बंदुका कमानाही ।
चालति वेगें योद्धे भेदन-पटुताचि यत्समा नाहीं ५८
गजमुक्त[1]-पृष्ठिं शोभे सोन्याची भव्य दिव्य अंबारी ।
ऐरावत[2]-स्थित गमे नृपतींत स-मोद जेंवि जंभारी[3] ५९
सरदार यवन होती मानकरिहि करि-विरूढ रजपूत ।
तत्तत्प्रांतापासुनि अधिकारी नृपतिनें समाहूत ६०
आक्बर बाबर-कुल-नृप-भास्कर स-विशेष दृष्टिला ओढी
लोकां चंद्र-विलोकनिं नतशी नक्षत्र-दर्शनीं प्रौढी ६१
ऐशा रीती भिरवे स्वजनान्वित मंडपीं प्रवेश करी ।
मुख्यासनीं विराजे नृप अंबरिं रवि जसा सहस्र[4] करीं ६२
समयोचित भाषण ते सरदार करून राय गौरविती ।
मधुरोत्तरांत वितरी जें सुख तो त्यांस त्या नसेच मिती[5] ॥ ६३
भूषा-वसनें अर्पिति मानकरी थोर सार्वभौमातें ।
मोहक गायन चाले सुख दाटे अंतरीं समाजातें ॥ ६४
नर-पुंगव ह्या समयीं सरदारांतें उदार[6]-धी वितरी ।
रत्नें मौक्तिक[7]-माला गुणवंतां सगुण अश्व-गणाहि करी ॥ ६५
सोनें रुपें सुगंधि द्रव्य तशा वस्तु आणखी रुचिर ।
तोलुनि तुलेंतें[8] भूप-श्रेष्ठासह वांटिती तदा सुचिर[9] ॥ ६६

---

१ 'गजमुक्त' नांवाच्या हत्तीवर. हें अकबराच्या हत्तीचें नांव होतें. २ ऐरावतावर बसलेला. ३ ( जंभ + अरि ) जंभ नांवाच्या दैत्याचा शत्रु–इंद्र. ४ हजार किरणांनीं. ५ परिमाण. ६ उदार बुद्धीचा. ७ मोत्यांच्या कंठ्या. ८ तागडींत. ९ बराच वेळपर्यंत.

सोन्याचे बादशहा तेवि रुप्याचे बदाम दुसरींही ।
उडवी फळें फलद त्या वेची जन हृष्ट त्या समुत्साहीं ॥ ६७
बैसे नृप सिंहासनिं जाई जवळून गज-घटा[1] मोठी ।
सालंकार सुवस्त्रीं मंडित वैभव अ-वर्ण्य तें ओठीं[2] ॥ ६८
शक्तीनें राक्षस हे[3] आकारें गमति पर्वतप्राय ।
वर्णानें सजल[4] जलद कर्णीं जणु वारितात निज[5] काय ॥ ६९
ते लांगूले हलवुनि शुंडादंडा उभारितां गमले ।
निजपोषणें कृतज्ञ प्रभुमूर्तिस पाहतां जणो रमले ॥ ७०
भूपाची त्यांच्यावरि त्यांची भूपावरी जडे भक्ति ॥
युद्धांत ते जयप्रद पाहे लोभावि गुणज्ञ मति[6]-शक्ति ॥ ७१
नीट शिके कसरत करि बत्ती तोफेस दे पतित वस्त[7] ॥
हस्तिपकाच्या[8] हस्तीं ठेवी निर्भय रणीं लढे मस्त ॥ ७२
वैराचें निर्यातन करणें सावधपणेंचि यच्छील[9] ।
आज्ञा-धारक अद्भुत जीव ह्मणे भूप सुखवि हा दील[10] ॥ ७३
हत्ती रत्नें[11] होतीं बादशहाचींच एकशें एक ।
यद्दंतीं ठेवुनि पद त्यांवरि बैसे पळांत निःशंक ॥ ७४
कुंजरें[12] पंच-सहस्रावधि होते राज-संग्रहीं अन्य ।
याचें-नांव ह्मणावें गजांत-लक्ष्मी[13]-पति प्रभू धन्य ॥ ७५

---

१ हत्तींचा समुदाय. २ ओठांनीं. ३ हत्ती. ४ पाण्यासहवर्तमान मेघ. (काळे) ५ आपलें शरीर. ६ बुद्धीचें सामर्थ्य. ७ जिन्नस. ८ महाताच्या. ९ ज्याचा स्वभाव. १० अंतःकरण. ११ जें स्वजातींत श्रेष्ट त्यास रत्न असें ह्मणतात. १२ हत्ती. १३ ( गज + अंत + लक्ष्मी ) ज्याच्या संग्रहीं हत्ती असतात त्याजवळ गजांत लक्ष्मी आहे असें ह्मणतात.

गेली क्रमें क्षणगमे भूमिग घन-पंक्ति मूर्तिमंत बरी ।
साश्चर्यानंद-भरा नृप-कुंजरें-चक्र-शक्र हृदयिं धरी ॥ ७६
मागून जाति घोडे थाटानें घातले जयां साज ।
वर जाति-वंत बळकट वेगानें हिंसत धरुनिया माज ॥ ७७
हा मित्र शिपायांचा आहे संग्राम-धीर रमणीय ।
प्रेमास्पद चपळेपरि तेजस्वी चपळ सद्गुण यदीय ॥ ७८
मोहून गुणज्ञाच्या हृदयातें स्व-वश करिति विश्वास्य ।
भक्त जसा देवाचें स्वामीचें एकनिष्ठ करि दास्य ॥ ७९
त्यांच्या मागुनि गेंडे साजविले व्याघ्र सिंहही चित्ते ।
ज्यांतें प्रेक्षक भाविति काळच विक्राळ मूर्त निज-चित्तें ॥ ८०
स्वारी अपूर्व ऐशी जाई देवालया स्तवी ईशें ।
गाजत वाजत परती येई मोदें स्वकीय सदनास ॥ ८१
सूर्यें अस्ता जातां ठेवियला आत्मकांति-भर वाटे ।
रात्रीं अग्नि-क्रीडा-दीपालींचा असा निचयें थाटे ॥ ८२

## सेलिमास राज्याचें अर्पण.

मंदाक्रांता.

भोगी राजा पद अवनिच्या रक्षणाचें सुजाण ।
देई लोकां अतुल कुशला उद्यमीं ज्यान शीण ॥

---

१ जमिनीवर प्राप्त झालेली. २ श्रेष्ठ राज्यांच्या मंडलाचा अधिपति. ३ योद्ध्याचा. ४ हें 'सद्गुण' याचें विशेषण. ५ विजेसारखे. ६ मूर्तिमंत मृत्युच. ७ परमेश्वर. ८ दारुकाम आणि दिव्यांचा समुदाय यांचा. ९ गर्दी.

चिंती चित्तीं अनवरत तो ईश्वराच्या पदासी ।
ध्यातां त्या कीं उणिव न पडे त्याचिया न्यांय्य[१] दासीं ॥ ८३

वसंततिलका.

अंतीं सुधी नृपति पुत्र सलीम यातें ।
आकोरुनी[२] जवळ टाकि न बा नयांतें[३] ॥
पाळी उदार निज - निष्ठ जनांस साचे ।
बोधूनि त्या वितरि राज्य - भरास वांचे[४] ॥ ८४
आणूनि वारि नयनीं स्व - कृपाण* भूप ।
कष्टें करून वरि हस्त तदा स - कंप ॥
दे त्यास सुज्ञ सुचवी निज राज्य रक्षी ।
योजून ह्यास समयास सदा विपक्षीं[५] ॥ ८५

## उपसंहार.

उपेंद्रवज्रा.

खलास शासी सुजनास तृप्त । करी महीचा पति हा अ - दृप्त[६] ।
रची उपाया जन - सौख्य व्हाया । धरेस दे कीर्ति-सुधा स्व गाया ८६
जसा वरी रम्य तसाच आंत । असे शरीरावरि गौर कांतें[७] ।
सशक्त उद्योग करी सदाही । प्रसिद्ध जो भूप दिशांस दाही ॥ ८७

इंद्रवज्रा.

होता मिता हार अ - रोग तेणें । उल्हास हा काय न होय लेणें ।
त्याच्या मनाचें मग वैरि कांन । दापील लोकीं न पवेल मान ? ॥ ८८

१ न्यायाचे मार्गास न सोडणाऱ्या. २ बोलावून. ३ नीतीस. ४ वाणीनें.
* आपली तलवार. ५ शत्रूवर. ६ गर्वरहित असा. ७ कांति वर्ण.

उपेंद्रवज्रा.

प्रसंग येतां अति शौर्य दावी । परी न वांछी रण तो वदावी ॥
सु-कीर्ति लोकीं मग कां न त्याची । मती विचारीं दृढ लग्न ज्याची ८९

इंद्रवज्रा.

जो भोग भोगी परि हाल सोशी । राज्याधिकारी परि जो न दोषी ॥
कामें तया फार तरी रिकामा । ज्ञानी परि गर्व न भू-ललामा[1] ॥ ९०
भव्याकृती तो वचनांत साधा । ऐश्वर्य मोठें परि त्या न बाधा ॥
लोभें दिली कोप यमासमान । होती दया शांतिहि ज्यां न मान ॥९१

शार्दूलविक्रीडित.

कामक्रोध मदांध त्यास करिती उद्दाम आंधीं[2] करी[3] ।
कांहीं वेळ कधीं कधीं क्षिति-पती तो यौवनाभ्यंतरीं[4] ॥
टाकी पाउल कुत्सितीं परि पथीं सन्मार्गवर्ती पुन्हा ।
होई सूक्ष्म-मती ह्मणून ह्मणती तो क्षम्य त्याचा गुन्हा ॥ ९२
वर्षारंभि[5] सरित्प्रवाह असतो जो कर्दमें मिश्रित ।
तो हो निर्मळ थोडक्या दिनिं करी लोकांस आनंदित ॥
तेणें श्लाघ्य-गुणास सेव्य गणिती तैसेच राजेश्वरा ।
दोषें निंदिति *नाल्प घालिति तया सत्कीर्तिचा तेतुरा ॥ ९३
दिल्ली-वल्लभ हिंदुचा वर सखा स्वामी प्रजांचा भला ।
धर्मीं सर्व समानतेस निरखी भाग्यें जना लाभला ॥

---

१ पृथ्वीला भूषणभूत अशा अकबरास. २ पहिल्यानें. ३ हत्ती. ४ तारुण्यांत. ५ पावसाळ्याच्या आरंभीं. * ( न + अल्प )

ज्याचें चित्त निरंतर प्रभु-पदीं[1] संलग्न पद्मीं अली[2] ।
प्रेमानेंच निजाश्रितीं उमगतां मोडी प्रबोधें कलि[3] ॥ ९४
दीनांचा कनवाळु गर्व न मनीं जो वैभवाचा धरी ।
पोशिंदा[4] वर-वर्णनीय गणिला जो सद्गुणांचा वरी ॥
वैरी आळस बुद्धिही न विजयी शत्रूंस दासत्व दे ।
विश्वासें सुजना सवें रसवती सानंद वाणी वदे ॥ ९५
होता आक्बर भूप-वर्य तनयां मायाळुसा बापतो ।
कांतांतें[5] प्रिय कांत[6] आठ सकळां स्नेहार्द्रही वाटतो ॥
जो शूरांस निजग्रणीच गमला युद्धांत मान-प्रद ।
गुंडा सर्व रसांत* तो विलसतो पृथ्वीस भूषांस्पद[7] ॥ ९६
जे होती मृत युद्धिं सैनिक-गणीं मोठ्या मनें आश्रय ।
त्यांच्या सत्वर वारसास वितरी भीतां करी निर्भय ॥
अंतीं तो नृप सार्व-भौम चटका लावून गेला जना ।
कीर्तीचा स्थिर देह ठेवुनि इथें त्याची सरे वर्णना[8] ॥ ४००

समाप्त.

---

१ परमेश्वराच्या चरणीं. २ भ्रमर, भुंगा. ३ भांडण. ४ याचा संबंध 'सद्गुणाचा' या शब्दाकडे. ५ आपल्या बायकांस. ६ नवरा. * श्रृंगार वीर इ० रसांत. ७ ( भूषा + आस्पद ) भूषणभूत असा. ८ वर्णन.

# शुद्धिपत्र.

| पृष्ट. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | ४ | स्थावरजंगत्म | स्थावर-जंगमात्मक* |
| ३ | ५ | करूनि | करुनि |
| ४ | २० | दृवे | देव |
| ७ | ४ | . | ३९ |
| ७ | ६ | सुखे | सुखें |
| ९ | १ | आर्या | गीति |
| ९ | ७ | त्यास | त्यांस |
| १० | १९ | छर्त्र | वेर्त्र |
| ११ | १४ | ७६ | ७३ |
| १४ | १४ | युद्धात | युद्धांत |
| १५ | १७ | करंडींक | करंडाकिं |
| ३८ | ८ | ते जें | तेजें |
| ४१ | १३ | स्वदेहापण | स्वदेहार्पण |
| ४२ | ३ | देह-वायु | देह वायु |
| ४६ | १२ | वाक | वाक् |
| ४६ | १३ | तयास | तयांस |
| ४७ | १७ | अतिघनगर्भी | अतिघनवनगर्भी |
| ४८ | २ | ८६ | ९३ |
| ४८ | ४ | ८७ | ९४ इ. |
| ४८ | ८ | आनंत | अनंत |
| ४९ | २० | असें | असे |
| ५३ | ४ | जें | जे |
| ५३ | १३ | प्रत-प्त | प्र-तप्त |
| ५५ | ४ | लांडे | लांडें |
| ५९ | १६ | नकळ | नकळे |
| ५९ | १८ | हि | ही |
| ६० | १० | जिवलगाच | जिवलगच |